I.I.F.-I (एकीकृत अन्‌ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** गोंदिया ग्रामीण **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0697 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/12/2025 13:35 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 18/11/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 04/12/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 16:22 तास **Time To (वेळेपर्यंत):** 15:55 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 05/12/2025 **Time (वेळ):** 12:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 021 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 05/12/2025 12:49 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** फुलचुर RTOकार्यालय गोंदिया,गोंदिया

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्‌दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अनिल मोहनरेड्डी जिट्टावार

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1981

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचप्रतिबंधक विभाग, नागपुर,, नागपुर,, गोंदिया ग्रामीण , गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचप्रतिबंधक विभाग, नागपुर,, नागपुर,, गोंदिया ग्रामीण , गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9823270581

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र सदाशिव केसकर | | | 1. श्री कापगते सर,Town/Village (शहर / गाव): शास्त्रीवार्ड गोंदिया,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया शहर,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजेश रामनिवास माहेश्वरी | | | 1. काली माता मंदीर जवळ,Town/Village (शहर / गाव): मनोहर कलोनी रोडरामनगर,गोंदिया,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया ग्रामीण,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या 500 रू. च्या 20नोटा असे 10,000/रू | 10,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | 500/रू .च्या 120 भारतीय बच्चो का बक असे लिहुन असलेल्या बनावट नोटा | .00 |
| 3 | इतर | यंत्र–उपकरण/उपसाधन | Sandisk32 GB एकुन04मेमोरी कार्ड | .00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 10,000.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

अपराध क्रमांक - 697/ 2025 कलम 7अ,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 सुधारणा 2018
फिर्यादी – अनिल मोहनरेड्डी जिट्टावार, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस उपअधिक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर,
मो.क. 9823270581
आरोपी – 1)आलोसे राजेंद्र सदाशिव केसकर, वय 53वर्ष पद-सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया
रा. ह.मु. श्री कापगते सर, शास्त्रीवार्ड यांचे घरी किरायाने, गोंदिया मूळ पत्ता फ्लॅट क. 501, गगन @ 33, बाणेर मालपाणि बिल्डींग जवळ, पूणे
2)राजेश रामनिवास माहेश्वरी, वय 57 वर्ष व्यवसाय-पी.यु.सी. सेंटर चालक रा. मनोहर कॉलोनी रोड, काली माता मंदीर जवळ, रामनगर, गोंदिया
घटनास्थळ – मौजा फुलचुर RTOकार्यालय गोंदिया 02कि.मी.पश्चीम
घटना ता. वेळ – दि.18/11/2025 चे वेळ 16/22 वा. ते दि. 04/12/2025 चे वेळ 15/55वा .दरम्यान

प्रकरण अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व पो. स्टॉफ सह सापळा रचुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं.2यांनी तक्रारदाराकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व आरोपी क्रं.01करीता लाच रक्कमेची मागणी करून तक्रारदार यांचे प्रलंबित काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. आरोपी क्रं.01 यांनी आरोपी क्रं.02यांना लाच मागणी करीता प्रोत्साहन दिले व शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लाच रक्कम तक्रारदार यांचे कडून पंचासमक्ष आरोपी क्रं.2 यांनी स्विकारल्याने,त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 सुधारणा 2018कलम 7अ,12 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता फिर्यादी यांचे लेखी तक्रारी वरुन सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला
दाखल-मपोहवा सुनिता पंधरे/1476

तपास-पो.नी.उमाकांत उगले ला. प्र. वी. गोंदिया

---

फिर्याद ला.प्र.वी. कार्यालय गोंदिया दिनांक 05/12/2025

माझे नाव :- अनिल जिट्टावार, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस उपअधिक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर, मो.क. 9823270581 .

समक्ष पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामिण, जिल्हा गोंदिया येथे हजर होउन लेखी फिर्याद देतो की, मी मागील 1 वर्षापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर येथे कार्यरत आहे. आम्ही दि. 18/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय नागपूर येथे दैनंदीन कामे करत हजर असताना 12.00 वा. चे दरम्यान आमचे समक्ष एक व्यक्ती हजर आले. त्यांनी त्यांचा आम्हास परिचय करून दिला. त्यांनी त्यांचे नाव सागर किशोर शाहाकार, वय36 वर्ष, व्यवसाय - खाजगी (सागर ड्रायव्हींग स्कुल, नागपूर) रा. लष्करीबाग, आंबेडकर कॉलोनी, समता मैदानाजवळ, नागपूर मोबाईल क्रमांक 8007587135असे सांगीतले. त्यांनी आम्हास एक लोकसेवक व एक खाजगी व्यक्ती विरुध्द तक्रार असल्याचे सांगितले. आम्ही त्यांना त्यांचे तक्रारीबाबत सविस्तर विचारपूस केली. त्यानुसार त्यांनी त्यांची तक्रार आम्हास सांगितली. त्यानंतर आम्ही त्यांना कोरा कागद व पेन उपलब्ध करून दिला व त्यांची तक्रार लेखी स्वरूपात त्यांचे हस्ताक्षरात देण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी त्यांची स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन त्यावर स्वाक्षरी करून प्रलंबित कामाचे कागदपत्रासह आम्हास सादर केली. ती तक्रार आम्ही वाचुन पाहीली. त्यानंतर आम्ही त्यांची तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन घेतली व तक्रारदार यांनी त्यावर सही केली. सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणून सही केली. सदर तक्रारी बाबत मा. अपर पोलीस अधिक्षक सा.लाप्रवि नागपूर यांना प्रत्यक्ष भेटुन त्यांना माहीती देवुन त्यांचे मार्गदर्शन प्राप्त केले त्यानंतर मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांची भेट घेवून सदर तक्रारी बाबत माहिती दिली असता तक्रारदार यांचे तक्रारीवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करा असे मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेशित केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घेवून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय येथे परत आलो. त्यानंतर गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने आम्ही मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग नागपूर यांचे नावाने पंच मागणी करीता पत्र लिहुन आमचे कार्यालयातील पोशि प्रफुल भातुलकर यांना 12.55 वा. खाना केले. त्यानुसार त्यांनी त्यांचे कार्यालयातील वर्ग-2 चे जितेंद्र श्रीराम पवार, वय 39 वर्ष, पद-निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, कार्यालय नागपूर, भरारी पथक क. 1 व वर्ग-3 श्रेणीचे निखिल खुशाल मेश्राम, वय 36 वर्ष, पद लिपिक, कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर यांना आमचे कार्यालयात पोशि प्रफुल भातुलकर यांचेसह पाठविले. वर नमूद कर्मचारी त्यांच्या कार्यालयातून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल येथे दोन्ही पंचाना घेवुन वेळ 14.30 वा. हजर आले. पोशि प्रफुल यांनी दोन्ही पंचाची आम्हाला ओळख करून दिली. आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमचेकडे एका लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदारकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकाविरुध्द सापळ्याचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. तरी होणाऱ्या कार्यवाहीत आपली पंच म्हणुन काम करण्याची तयारी आहे का? असे

विचारल्यावर दोन्ही पंचानी पडताळणी व सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविली. त्याबाबतचे संमतीपत्र दोन्ही पंचाकडून लिहून घेण्यात आले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांनी लिहुन दिलेली तक्रार दाखविली ती खालीलप्रमाणे, माझे नाव :- सागर किशोर शाहाकार, वय 36 वर्ष, व्यवसाय खाजगी (सागर ड्रायव्हींग स्कुल, नागपूर) रा. लष्करीबाग, आंबेडकर कॉलोनी, समता मैदानाजवळ, नागपूर - मोबाईल क्रमांक 8007587135.

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय, नागपूर येथे हजर राहुन तक्रार नोंदवितो की, मी वर नमुद ठिकाणी राहत असून सागर ड्रायव्हींग स्कुल, आवळे बाबू चौक नागपूर येथे असुन त्याव्यतीरिक्त भी प्रादेशिक परिवहन विभागासंबंधाचे गाडी हस्तांतरण, वाहन परवाना, वाहनाचे टॅक्स, परमिट, फिटनेस व इतर वाहनासंबंधी काम करण्याकरिता येणाऱ्या ग्राहकांना त्यांचे विनंतीवरुन अर्ज लिहुन व भरुन देण्याचे काम करण्याचा व्यवसाय करतो. त्याबदल्यात ग्राहक मला त्यांचे इच्छेनुसार वाजवी मोबदला देत असतात. श्री. शिशिर माकडे, रा. वाडी नागपूर हे माझे मामे भाऊ असुन त्यांचा जुन्या चारचाकी खरेदी व विकीचा व्यवसाय आहे. त्यांचे माध्यमातुन तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर रा. हरदोली, पोस्ट सावली (डोंगरगाव) ता. आमगाव जि. गोंदिया यांनी प्रादेशिक परिवहन विभाग चांचेल, जिल्हा मालदा राज्य पश्चिम बंगाल यांचे अंतर्गत सन 2019 चे मॉडल असलेले जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34बी.एम.4389 हे वाहन वाहन मालक नामे एस. के. नसीर अली रहमान अली रा. केअर ऑफ बादल आय.टी. आय. रोड, विदयासागर जवळ, ज्योती नगर, जयपालगुरी, पश्चिम बंगाल यांचेकडून 15 लाख रूपयांमध्ये जुन 2024 मध्ये खरेदी केले होते. त्यानंतर जुन 2024 मध्ये सहा. प्रादेशिक परिवहन विभाग चांचेल जिल्हा मालदा पश्चिम बंगाल येथुन ऑनलाईन नाहरकत प्रमाणपत्र उप प्रादेशिक परिवहन विभाग, गोंदिया येथे श्री. तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने आले आहे. श्री. तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांनी माझी सदर वाहनाचे हस्तांतरणाच्या कामाकरीता नेमणुक केली असुन मला लेखी अधिकार पत्र दिलेले आहे. मला श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांनी सन 2019 चे मॉडेल असलेले जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरणाच्या कामाचे अधिकारपत्र दिले असल्याने, मी दि. 05/07/2024 रोजी श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने सदर वाहन हस्तांतरण होण्याकरीता आवश्यक कागदपत्रे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, गोंदिया येथे जमा केले होते. कागदपत्रे जमा केल्यानंतर अंदाजे 02 ते 03 दिवसांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, गोंदिया येथील आस्थापना विभागात मी सदर वाहनाचे कामाबद्दल विचारणा करण्याकरीता गेलो असता तेथील क्लर्क त्यांचे नाव मला सध्या आठवत नाही त्यांनी मला सांगितले की, तुम्ही श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने सदर वाहन हस्तांतरण होण्याकरीता जमा केलेले कागदपत्रे दिसत नसुन तुम्ही कागदपत्रे परत घेवुन गेले आहे असे मला बोलले. त्यावरून मी त्यांना म्हटले की मी कागदपत्रे घेवुन गेलो नाही मी कागदपत्रे तुम्हालाच दिले होते तेव्हा तुम्ही, मी मेल पाठवितो असे म्हटले होते. त्यानंतर मी कार्यालयातुन निघुन गेलो. मी पुन्हा 08 ते 10 वेळा उप प्रादेशिक परिवहन विभाग, गोंदिया येथील आस्थापना विभागात जावुन तेथील श्री. पुरी बाबु यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी सुद्धा मला आमचे कार्यालयात तुमचे कागदपत्रे नाहीत असे सांगितले. मी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय गोंदिया येथे दि. 01/10/2025 रोजी माझे सदर कामाबाबत गेलो असतांना तेथे कार्यालयात मी एका

व्यक्तीसोबत माझे सोबत घडलेला प्रसंग सांगत असतांना त्या व्यक्तीने मला श्री. राजेश माहेश्वरी मोबाईल क. 8329352091 असा नंबर दिला व मला सांगितले की, या व्यक्तीसोबत बोलुन घे त्यांचे येथिल साहेब लोकांसोबत चांगले संबंध आहेत, तो तुझे काम करून देवु शकतो असे सांगितले. मी दिनांक 02/10/2025 रोजी श्री. राजेश माहेश्वरी मोबाईल क. 8329352091 यांना माझे मोबाईल क. 8007587135 वरून कॉल करून माझे कामाबाबत बोललो असता त्यांनी सांगितले की आज सुट्टी आहे उदया दिनांक 03/10/2025 रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे येवुन मला भेटा व सोबत सर्व कागदपत्रे घेवुन या असे बोलल्याने मी दिनांक 03/10/2025 रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे गेलो. तिथे श्री. राजेश माहेश्वरी यांना भेटलो त्यांनी श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने वाहन हस्तांतरणाची कागदपत्रे पाहुन तपासली व मला बोलले की, तुम्हारा काम हो जायेंगा पहले मैं केसकर साहब से बात करता हूँ फिर तुम को बताता हु असे मला सांगितले.त्यानंतर मला 02 ते 03 दिवसानंतर श्री. राजेश माहेश्वरी यांचे मोबाईल क. 8329352091 वरून माझे मोबाईल क्रमांकावर कॉल आला व त्यांनी मला सांगितले की, तुम्हारा काम हो जायेंगा, टॅक्स छोडके केसकर साहाब के और मेरे मिलाकर 70 हजार रूपया आपको देना पड़ेगा असे त्यांनी मला बोलले. त्यावरून मी त्यांना कुछ कम करो असे म्हटले असता त्यांनी मला बाबुसे लेकर उपर तक सबको देना पडता है असे बोलले त्यावर मी नाईलाजाने त्यांना होकार दिला.दिनांक 09/10/2025 रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, गोंदिया येथुन सन 2019 चे मॉडल असलेले जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी. एम. 4389 या वाहनाच्या व्हेरीफिकेशन करीता वाहन हजर करण्याचा आदेश मला श्री. राजेश माहेश्वरी यांनी त्यांचे व्हॉट्सॲप क्रमांक 8329352091 वरून माझे व्हॉट्सॲप क्रमांक 8007587135 वर पाठविला. अंदाजे 08 ते 10 दिवसांपूर्वी श्री. राजेश माहेश्वरी यांनी वाहन मालक श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांना संपर्क करून त्यांना जे.सी.बी. वाहन क. डब्लू. बी. 34 बी.एम. 4389 हे चेक पोस्ट रावणवाडी गोंदिया येथे बोलावुन उप प्रादेशिक परिवहन विभाग गोंदियाचे अधिकारी यांचेकडून व्हेरीफिकेशन करून घेतले. मला जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम.4389 या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता श्री राजेश माहेश्वरी यांनी स्वतः करीता व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया श्री केसकर यांचेकरीता एकुण 70,000/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे. वरिल गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी स्वतः करीता व केसकर साहेब, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे करीता मागितलेली लाच रक्कम देण

फिर्याद ला.प्र.वी. कार्यालय गोंदिया दिनांक 05/12/2025

माझे नाव :- अनिल जिट्टावार, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस उपअधिक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर, मो.क. 9823270581 .

समक्ष पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामिण, जिल्हा गोंदिया येथे हजर होउन लेखी फिर्याद देतो की, मी मागील 1 वर्षापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर येथे कार्यरत आहे. आम्ही दि. 18/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय नागपूर येथे दैनंदीन कामे करत हजर असताना 12.00 वा. चे दरम्यान आमचे समक्ष एक व्यक्ती हजर आले. त्यांनी त्यांचा आम्हास परिचय करून दिला. त्यांनी त्यांचे नाव सागर किशोर शाहाकार, वय36 वर्ष, व्यवसाय -

खाजगी (सागर ड्रायव्हींग स्कुल, नागपूर) रा. लष्करीबाग, आंबेडकर कॉलोनी, समता मैदानाजवळ, नागपूर मोबाईल क्रमांक 8007587135असे सांगीतले. त्यांनी आम्हास एक लोकसेवक व एक खाजगी व्यक्ती विरुध्द तक्रार असल्याचे सांगितले. आम्ही त्यांना त्यांचे तक्रारीबाबत सविस्तर विचारपूस केली. त्यानुसार त्यांनी त्यांची तक्रार आम्हास सांगितली. त्यानंतर आम्ही त्यांना कोरा कागद व पेन उपलब्ध करून दिला व त्यांची तक्रार लेखी स्वरूपात त्यांचे हस्ताक्षरात देण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी त्यांची स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन त्यावर स्वाक्षरी करून प्रलंबित कामाचे कागदपत्रासह आम्हास सादर केली. ती तक्रार आम्ही वाचुन पाहीली. त्यानंतर आम्ही त्यांची तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन घेतली व तक्रारदार यांनी त्यावर सही केली. सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणून सही केली. सदर तक्रारी बाबत मा. अपर पोलीस अधिक्षक सा.लाप्रवि नागपूर यांना प्रत्यक्ष भेटुन त्यांना माहीती देवुन त्यांचे मार्गदर्शन प्राप्त केले त्यानंतर मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांची भेट घेवून सदर तक्रारी बाबत माहिती दिली असता तक्रारदार यांचे तक्रारीवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करा असे मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेशित केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घेवून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय येथे परत आलो. त्यानंतर गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवश्यकता असल्याने आम्ही मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग नागपूर यांचे नावाने पंच मागणी करीता पत्र लिहुन आमचे कार्यालयातील पोशि प्रफुल भातुलकर यांना 12.55 वा. खाना केले. त्यानुसार त्यांनी त्यांचे कार्यालयातील वर्ग-2 चे जितेंद्र श्रीराम पवार, वय 39 वर्ष, पद-निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, कार्यालय नागपूर, भरारी पथक क. 1 व वर्ग-3 श्रेणीचे निखिल खुशाल मेश्राम, वय 36 वर्ष, पद लिपिक, कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क विभाग, नागपूर यांना आमचे कार्यालयात पोशि प्रफुल भातुलकर यांचेसह पाठविले. वर नमूद कर्मचारी त्यांच्या कार्यालयातून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल येथे दोन्ही पंचाना घेवुन वेळ 14.30 वा. हजर आले. पोशि प्रफुल यांनी दोन्ही पंचाची आम्हाला ओळख करून दिली. आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमचेकडे एका लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदारकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकाविरुध्द सापळ्याचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. तरी होणाऱ्या कार्यवाहीत आपली पंच म्हणुन काम करण्याची तयारी आहे का? असे विचारल्यावर दोन्ही पंचानी पडताळणी व सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविली. त्याबाबतचे संमतीपत्र दोन्ही पंचाकडून लिहून घेण्यात आले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांनी लिहुन दिलेली तक्रार दाखविली ती खालीलप्रमाणे, माझे नाव :- सागर किशोर शाहाकार, वय 36 वर्ष, व्यवसाय खाजगी (सागर ड्रायव्हींग स्कुल, नागपूर) रा. लष्करीबाग, आंबेडकर कॉलोनी, समता मैदानाजवळ, नागपूर - मोबाईल क्रमांक 8007587135.

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय, नागपूर येथे हजर राहुन तक्रार नोंदवितो की, मी वर नमुद ठिकाणी राहत असून सागर ड्रायव्हींग स्कुल, आवळे बाबू चौक नागपूर येथे असुन त्याव्यतीरिक्त भी प्रादेशिक परिवहन विभागासंबंधाचे गाडी हस्तांतरण, वाहन परवाना, वाहनाचे टॅक्स, परमिट, फिटनेस व इतर वाहनासंबंधी काम करण्याकरिता येणाऱ्या ग्राहकांना त्यांचे

विनंतीवरुन अर्ज लिहुन व भरुन देण्याचे काम करण्याचा व्यवसाय करतो. त्याबदल्यात ग्राहक मला त्यांचे इच्छेनुसार वाजवी मोबदला देत असतात. श्री. शिशिर माकडे, रा. वाडी नागपूर हे माझे मामे भाऊ असुन त्यांचा जुन्या चारचाकी खरेदी व विकीचा व्यवसाय आहे. त्यांचे माध्यमातुन तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर रा. हरदोली, पोस्ट सावली (डोंगरगाव) ता. आमगाव जि. गोंदिया यांनी प्रादेशिक परिवहन विभाग चांचेल, जिल्हा मालदा राज्य पश्चिम बंगाल यांचे अंतर्गत सन 2019 चे मॉडल असलेले जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34बी.एम.4389 हे वाहन वाहन मालक नामे एस. के. नसीर अली रहमान अली रा. केअर ऑफ बादल आय.टी. आय. रोड, विदयासागर जवळ, ज्योती नगर, जयपालगुरी, पश्चिम बंगाल यांचेकडून 15 लाख रूपयांमध्ये जुन 2024 मध्ये खरेदी केले होते. त्यानंतर जुन 2024 मध्ये सहा. प्रादेशिक परिवहन विभाग चांचेल जिल्हा मालदा पश्चिम बंगाल येथुन ऑनलाईन नाहरकत प्रमाणपत्र उप प्रादेशिक परिवहन विभाग, गोंदिया येथे श्री. तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने आले आहे. श्री. तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांनी माझी सदर वाहनाचे हस्तांतरणाच्या कामाकरीता नेमणुक केली असुन मला लेखी अधिकार पत्र दिलेले आहे. मला श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांनी सन 2019 चे मॉडेल असलेले जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरणाच्या कामाचे अधिकारपत्र दिले असल्याने, मी दि. 05/07/2024 रोजी श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने सदर वाहन हस्तांतरण होण्याकरीता आवश्यक कागदपत्रे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, गोंदिया येथे जमा केले होते. कागदपत्रे जमा केल्यानंतर अंदाजे 02 ते 03 दिवसांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, गोंदिया येथील आस्थापना विभागात मी सदर वाहनाचे कामाबद्दल विचारणा करण्याकरीता गेलो असता तेथील क्लर्क त्यांचे नाव मला सध्या आठवत नाही त्यांनी मला सांगितले की, तुम्ही श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने सदर वाहन हस्तांतरण होण्याकरीता जमा केलेले कागदपत्रे दिसत नसुन तुम्ही कागदपत्रे परत घेवुन गेले आहे असे मला बोलले. त्यावरून मी त्यांना म्हटले की मी कागदपत्रे घेवुन गेलो नाही मी कागदपत्रे तुम्हालाच दिले होते तेव्हा तुम्ही, मी मेल पाठवितो असे म्हटले होते. त्यानंतर मी कार्यालयातुन निघुन गेलो. मी पुन्हा 08 ते 10 वेळा उप प्रादेशिक परिवहन विभाग, गोंदिया येथील आस्थापना विभागात जावुन तेथील श्री. पुरी बाबु यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी सुद्धा मला आमचे कार्यालयात तुमचे कागदपत्रे नाहीत असे सांगितले. मी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय गोंदिया येथे दि. 01/10/2025 रोजी माझे सदर कामाबाबत गेलो असतांना तेथे कार्यालयात मी एका व्यक्तीसोबत माझे सोबत घडलेला प्रसंग सांगत असतांना त्या व्यक्तीने मला श्री. राजेश माहेश्वरी मोबाईल क. 8329352091 असा नंबर दिला व मला सांगितले की, या व्यक्तीसोबत बोलुन घे त्यांचे येथिल साहेब लोकांसोबत चांगले संबंध आहेत, तो तुझे काम करून देवु शकतो असे सांगितले. मी दिनांक 02/10/2025 रोजी श्री. राजेश माहेश्वरी मोबाईल क. 8329352091 यांना माझे मोबाईल क. 8007587135 वरून कॉल करून माझे कामाबाबत बोललो असता त्यांनी सांगितले की आज सुट्टी आहे उदया दिनांक 03/10/2025 रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे येवुन मला भेटा व सोबत सर्व कागदपत्रे घेवुन या असे बोलल्याने मी दिनांक 03/10/2025 रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे गेलो. तिथे श्री. राजेश माहेश्वरी यांना भेटलो त्यांनी श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांचे नावाने वाहन हस्तांतरणाची कागदपत्रे पाहुन तपासली व मला बोलले की, तुम्हारा काम हो जायेंगा पहले मैं केसकर साहब से बात करता हूँ फिर तुम को बताता हु असे मला

सांगितले.त्यानंतर मला 02 ते 03 दिवसानंतर श्री. राजेश माहेश्वरी यांचे मोबाईल क. 8329352091 वरून माझे मोबाईल क्रमांकावर कॉल आला व त्यांनी मला सांगितले की, तुम्हारा काम हो जायेंगा, टॅक्स छोडके केसकर साहाब के और मेरे मिलाकर 70 हजार रूपया आपको देना पड़ेगा असे त्यांनी मला बोलले. त्यावरून मी त्यांना कुछ कम करो असे म्हटले असता त्यांनी मला बाबुसे लेकर उपर तक सबको देना पडता है असे बोलले त्यावर मी नाईलाजाने त्यांना होकार दिला.

दिनांक 09/10/2025 रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, गोंदिया येथुन सन 2019 चे मॉडल असलेले जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी. एम. 4389 या वाहनाच्या व्हेरीफिकेशन करीता वाहन हजर करण्याचा आदेश मला श्री. राजेश माहेश्वरी यांनी त्यांचे व्हॉट्सअँप क्रमांक 8329352091 वरून माझे व्हॉट्सअँप क्रमांक 8007587135 वर पाठविला. अंदाजे 08 ते 10 दिवसांपूर्वी श्री. राजेश माहेश्वरी यांनी वाहन मालक श्री तारकेश्वर सुरेश ब्राम्हणकर यांना संपर्क करून त्यांना जे.सी.बी. वाहन क. डब्लू. बी. 34 बी.एम. 4389 हे चेक पोस्ट रावणवाडी गोंदिया येथे बोलावुन उप प्रादेशिक परिवहन विभाग गोंदियाचे अधिकारी यांचेकडून व्हेरीफिकेशन करून घेतले. मला जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम.4389 या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता श्री राजेश माहेश्वरी यांनी स्वतः करीता व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया श्री केसकर यांचेकरीता एकुण 70,000/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे.

वरिल गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी स्वतः करीता व केसकर साहेब, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे करीता मागितलेली लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे त्यांचेविरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्यासाठी सदर तक्रार देत आहे. मला गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी स्वतः करीता तसेच श्री. केसकर यांचेकरीता एकूण 70,000/- रू. लाचेची मागणी केली आहे परंतू माझेकडे ऐवढी मोठी रक्कम नसल्याने मी लाचेमध्ये देण्याकरीता माझे बचतीतील 10,000/-रुपये सोबत आणले असुन व जे.सी.बी. वाहन क. डब्लू. बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरणाचे छायांकित कागदपत्रे हजर करीत आहे. माझे श्री राजेश माहेश्वरी व श्री केसकर यांच्याशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणुन मी स्वेच्छेने तक्रार देत आहे. अशी तक्रार पंचानी वाचुन तक्रारीबाबत तक्रारदार यांचेशी तोंडी विचारपुस करून ती बरोबर असल्याची खात्री केल्यावर त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्षऱ्या केल्या व त्यानंतर सदरची तक्रार आम्ही संगणकावर टंकलिखीत करून त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्षऱ्या केल्या. तकारदार यांनी दिलेल्या 500/- रू. दराच्या 20 नोटा आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या. जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम.4389 या वाहनाचे हस्तांतरण करण्याकरीता तक्रारदार यांना 70,000/- रु. ची लाचेची मागणी करण्यात आली परंतू तक्रारदार यांनी कार्यालयात फक्त 10,000/-रू. जमा केले असल्याने, उर्वरीत 60,000/-रू हे 500/-रू दराच्या 120 भारतीय बच्चो का बँक असे लिहुन असलेल्या बनावट नोटा लोकसेवकास देण्याकरीता कार्यालयातुन उपलब्ध करून घेतल्या. त्यानंतर आम्ही, प्रात्यक्षिक पंचनाम्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे तक्रारदार व दोन्ही पंचाना अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोग व अँथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. तसेच सापळा पडताळणी कार्यवाही दरम्यान व सापळा कार्यवाही दरम्यान घ्यावयाची खबरदारीबाबत तक्रारदार व पंच क. 1 व 2 तसेच सापळा पथकातील सर्व

सदस्यांना स्वतंत्र सुचना दिल्या, त्यानंतर महिला अंमलदार करूणा सहारे यांना प्रात्याक्षिक करून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे महिला अंमलदार करुणा सहारे यांनी कार्यालयातील लाकडी कपाटातुन एक सिलंबद लिफापा बाहेर काढला. दोन्ही पंचांनी सदर लिफापा सिलबंद असल्याची खात्री केल्यावर महिला अंमलदार करूणा सहारे यांनी लिफापा फाडून त्यामधुन अँथ्रॉसीन पावडर लेबल असलेली एक प्लास्टिक शिशी बाहेर काढून तक्रारदार व पंचाना दाखविली. दोन्ही पंचासमक्ष त्या शिशीचे झाकण उघडून त्यामधील पावडर महिला अंमलदार करूणा यांनी आपल्या हाताच्या बोटास लावून त्या बोटाने एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर रेष मारुन दाखविली. ती रेष कार्यालयात उजेडामध्ये दिसत नव्हती. त्यानंतर कार्यालयाचे दारे, खिडक्या व विद्युत दिवे पुन्हा बंद केली व प्रकाशाची तिव्रता कमी करून त्या कागदावर अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता कागदावर बोटाने रेष मारलेल्या ठिकाणी अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. नंतर दारे खिडक्या उघडून प्रकाश पुर्ववत केला असता कोणतीच चकाकी दिसून आली नाही. तद्नंतर लाच कार्यवाही जमा केलेल्या 500/-रू दराच्या 20 नोटांचे नंबर टंकलिखित करून सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात आले 500/-रू दराच्या 20 चलनी नोटा हया 500 नमुद असलेल्या भारतीय बच्चो का बँक लिहीलेल्या 120 बनावट नोटा मध्यभागी ठेवुन त्यावर वरील बाजुस 500/-रू. दराच्या 10 चलनी नोटा व खालील बाजुस 500/-रु. दराच्या 10 चलनी नोटा ठेवुन एकुण 70,000/-रू. चा एक बंडल बनवुन लाच रक्कम एका लिफाप्या मध्ये ठेवुन त्या लिफाप्यावर सुद्धा अँथ्रासीन पावडर लावुन तो लिफापा एका दुसऱ्या लिफाप्यात ठेवण्याच्या सुचना दिल्याप्रमाणे मपोहवा करूणा सहारे यांनी कार्यवाही करून एकुण 70,000/- रूपयाचा तयार केलेला नोटांचा बंडल लोकसेवकास देण्याकरीता तयार करून सदर रक्कम एका लिफाप्यात ठेवल्या व त्या लिफाप्यास दोन्ही बाजुने अँथ्रासीन पावडर लावुन तो लिफापा दुसऱ्या लिफाप्यात टाकुन तो लिफापा ट्रॅप बॅगेत लोखंडी आलमारीत सुरक्षित ठेवण्यात आला त्यानंतर महिला पोलीस अंमलदार करूणा सहारे यांना सापळा कार्यवाहीतुन वगळण्यात आले. आमचे कार्यालयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा तकारदार व गै.अ. यांच्यात सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान होणारे संभाषण रेकॉर्ड करण्याकरिता उपयोग करण्यात येणार आहे. सदर उपकरण रेकॉडींग मोडवर सुरू केल्यास रेकॉर्ड झालेल्या संभाषणाची व्हॉईस फाईल अँटोमॅटीकपणे तयार होत असून जर हे उपकरण बंद झाले तर रेकॉर्डीग सुध्दा बंद होते आणि व्हॉईस फाईल बंद होते.

आणि पुन्हा जर रेकॉर्डीग मोडवर सुरू केले असता नविन व्हॉईस रेकॉर्डीग फाईल तयार होते व पुर्वीची रेकॉर्ड फाईल खराब होत नाही किंवा त्यावर पुनर्लिखान किंवा पुर्नमुद्रीत होत नाही. सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर "सोनी" कंपनीच्या बनावटीचे ICD PX 470 मॉडेलचे आहे. आमचे सुचनेवरून पोलीस अंमलदार सारंग बालपांडे यांनी पंचासमक्ष आलमारीतून नवीन सिलबंद प्लास्टीकचे पाकीट काढले व ते पाकीट फोडून त्यातील Sandisk 32GB Micro SDHC I 32GB मेमरी कार्ड दाखवून त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून दाखविण्यात आले. व्हॉइस रेकॉर्डरच्या इंटरनल मेमोरीमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हॉईस रेकॉडींगची फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यांनतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सांगितले की, सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड होणारे संभाषण मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होईल त्यानंतर ते मेमोरी कार्ड ताब्यात घेवून एका लिफाफ्यात ठेवून आमचे व पंचाचे सहीने

सिलंबद करण्यात येईल. अशी माहीती देउन सदर सापळा कार्यवाहीत श्री. निखिल खुशाल मेश्राम हे पंच क. 1 व श्री जितेंद्र श्रीराम पवार हे पंच क. 2 म्हणुन कामगिरी बजावतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. प्रात्यक्षीक पंचनाम्यात नमुद केलेप्रमाणे तकारदार, पंच क्र. 1 व पंच क्र.2 यांनी बजावण्याचे कामगिरीबाबत सविस्तर सुचना देण्यात आल्या. तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांनी गैरअर्जदार खाजगी व्यक्ती राजेश माहेश्वरी यांना त्यांचे कामाबाबत तसेच गोंदिया येथे कधी यायचे आहे याबाबत मोबाईलवर कॉल करून विचारणा करण्याची विनंती केल्याने आम्ही त्यांना दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, आपण गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांचेशी मोबाईलवर बोलणी करावी ते आम्ही डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करणार आहे असे सांगुन गैरअर्जदार खाजगी व्यक्ती श्री. राजेश माहेश्वरी यांनी स्वतः करीता व लोकसेवक श्री. केसकर पद-उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचेकरीता तक्रारदारास जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी. एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरण करण्याकरीता 70,000/-रु. लाचेची मागणी केली असल्याचे तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याने गैरअर्जदार खाजगी व्यक्ती श्री. राजेश माहेश्वरी यांच्या लाचेची मागणीची पडताळणी मोबाईलद्वारे करण्याचे सर्वानुमते लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल नागपूर कार्यालयातुन ठरविण्यात आले.त्यानंतर खाजगी व्यक्ती गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांची लाच मागणी पडताळणी मोबाईलद्वारे करणे असल्याने तक्रारदार व पंच क.01 यांना पंचनाम्यात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक सुचना देण्यात आल्या. आमचे सुचनेवरून सापळा पथकातील सदस्य ना.पो.शि. सारंग बालपांडे यांनी "सोनी" (मॉडेल क्र. ICD-PX470) कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर Sandisk32 GB Micro SDHC card serial no. 4237ZVL103C8 वर्णनाचे मेमोरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर रेकॉडींग मोडवर वेळ 19.18 वा. सुरू करण्यात आले. तक्रारदार यांनी आपले मोबाईल क्रमांक 8007587135 वरून खाजगी व्यक्ती गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांचा आपल्या मोबाईल फोन मध्ये सेव्ह असलेला मोबाईल क्रमांक 8329352091 वर कॉल करून आपला मोबाईल स्पीकर मोडवर ठेवुन संभाषण केले. संभाषणा दरम्यान गैरअर्जदार खाजगी व्यक्ती श्री राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम.4389 या वाहनाचे हस्तांतरण करण्याकरीता 40,000/-रू. शासकिय टॅक्स लागेल त्यांच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लागेल अशी लाचेची मागणी केल्याची आम्ही व दोन्ही पंचांनी खात्री केली. त्यानंतर लगेच तक्रारदार व गैरअर्जदार खाजगी व्यक्ती श्री. राजेश माहेश्वरी यांचे दरम्यान लाच मागणी पडताळणीचे मोबाईलवर झालेले संभाषण संपल्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये पडताळणी झाल्याबाबत पंच क. 1 यांचा आवाज रेकॉर्ड करून आम्ही वेळ सुमारे 16.28 वाजता रेकॉर्डर बंद केला. सदर संभाषणातील लाच मागणी पडताळणी संबंधाने घटनेशी लागू व ऐकीव संभाषणाचे शब्दशः टिपण (स्क्रिप्ट) कार्यालयात शासकिय संगणकावर टंकलिखीत करण्यात आले. मोबाईलवरील सापळा पडताळणी संभाषणा दरम्यान तक्रारदार यांना गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी दिनांक 19/11/2025 रोजी भेटण्याकरीता गोंदिया येथे बोलाविल्याने दिनांक 19/11/2025 रोजी गैरअर्जदार खाजगी व्यक्ती श्री. राजेश माहेश्वरी तसेच लोकसेवक श्री. केसकर पद- उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांनी तक्रारदार यांना जे.सी. बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी. एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरण करण्याकरीता 70,000/-रू. लागेल अशी लाचेची मागणी केल्याचे नमुद केले असल्याने दोघांची प्रत्यक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी दिनांक 19/11/2025 रोजी गोंदिया येथुन

करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार आम्ही पडताळणी पंचनामा क. 2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व साहित्यासह तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्यांना सुचना देवून दिनांक 19/11/2025 रोजी 08.10वा, गोंदिया येथे जाण्याकरीता तक्रारदार, पंच क. 1, व आम्ही तसेच सापळा पार्टीतील सदस्य पोनि. जितेंद्र वैरागडे, नापोशि सारंग बालपांडे, असे पोनि. जितेंद्र वैरागडे यांचे खाजगी चारचाकी वाहनाने तसेच पंच क.2, मपोहवा अस्मिता मेश्राम, पोशि होमेश्वर वाईलकर, पोशि प्रफुल भातुलकर असे शासकिय वाहन क. एम.एच. 31, डी.झेड 0473 चे चालक नापोशि राजेंद्र जांभुलकर यांचेसह लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल नागपूर कार्यालयातुन नागपूर, भंडारा, कोहमारा, गोंदिया या मार्गाने जाणेकरीता रवाना झालो. जवळपास पोहचुन आम्ही तक्रारदार यांना उप प्रादेशीक परीवहन कार्यालय गोंदिया जवळील गोपनियता राखली जाईल असे सुरक्षित स्थानाबाबत विचारल्याने त्यांनी गोंदिया आमगाव रोड वर परमाका ट्रेडींग कंपनी जवळ, फुलचूर, गोंदिया हे ठिकान सुचविले. त्यानंतर आम्ही सर्व गोंदिया आमगाव रोड वर परमाका ट्रेडींग कंपनी जवळ अंदाजे 11.30 वा. पोहचलो. त्यानंतर खाजगी व्यक्ती गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांची लाच मागणी पडताळणी करण्याकरीता पाठविणे असल्याने तक्रारदार व पंच क्र.01 यांना पंचनाम्यात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक सुचना देण्यात आल्या. आमचे सुचनेवरून सापळा पथकातील सदस्य ना.पो.शि. सारंग बालपांडे यांनी "सोनी" (मॉडेल क्र. ICD-PX470) कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर Sandisk32 GB Micro SDHC card serial no.4237ZVL103C8 वर्णनाचे मेमोरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर रेकॉडींग मोडवर वेळ 13.10वा. सुरू करण्यात आले. तक्रारदार व पंच क. 1यांना वेळ 13.15 वा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदियाकडे गेल्यानंतर आम्ही सापळा पार्टीतील चारचाकी वाहनात असलेले सदस्य व पंच क. 02 हे प्रादेशिक परिवहन कार्यालय जवळ मेन रोड गोंदिया परिसर येथे तक्रारदार व पंच क. 1 यांची परत येण्याची वाट पाहत चारचाकी वाहनात बसुन थांबुन राहीलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी 14.00 वा. परत आले. त्यानंतर आम्ही पंच क.1 यांना तक्रारदार श्री. सागर शाहाकार व गै.अ. श्री. राजेश माहेश्वरी व श्री. केसकर यांच्यात लाच रकमेबाबत झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले उपप्रादेशिक परिवहन विभाग येथे जावून तक्रारदार यांनी गैरअर्जदार राजेश माहेश्वरी गोंदिया आर.टी.ओ.या नावे सेव्ह असलेल्या मोबाईल क. 8329352091 यावर कॉल करून तक्रारदाराने त्यांचा मोबाईल स्पिकर मोडवर ठेवला, गैरअर्जदार यांनी त्यांचा कॉल उचलून मोबाईलवर बोलणी केली बोलणीमध्ये तक्रारदार यांनी कहा हो राजु भैय्या मै आर.टी.ओ. ऑफीस के सामने गोंदिया आया हु असे म्हटल्यावर गैरअर्जदार यांनी आ जाओ दुकान पे असे बोलले. त्यावर तक्रारदार यांनी वो जहा पे मिले थे वहा आना है क्या, असे म्हणुन कॉल कट केला. त्यानंतर तक्रारदार हे मला उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदियाचे मेन गेट बाहेर घेवुन आले तेथेच बाहेर रोडच्या पलीकडे ऑनलाईन कामे करून देणाऱ्या दुकानांची रांग होती. तिथे मी व तक्रारदार हे गैरअर्जदार बसुन असलेल्या ऑनलाईन वर्क करून देणाऱ्या दुकानाचे आत सदर दुकान ही अंदाजे 10x15 लांबी रुंदीची होती. त्या दुकानात तक्रारदार व गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचे दरम्यान तक्रारदार यांचे वाहनाच्या कामाच्या हस्तांतरणा संदर्भात बरेच बोलणे झाले. गैरअर्जदार हे तक्रारदारास बोलले की, ब्राम्हणकर को कल फोन लगाया था ब्राम्हणकर कल आयेगा इधर से लेटर भेजा हुआ है. ब्राम्हणकर कल आयेगा तो उसको साहब के पास ले के जाना है. गाडी का

व्हेरीफिकेशन कर दिया है साहब से. एफ.टी. हो गयी है. साहाब ने बोला है की, गाडी मालक को बुला लो. तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना भैय्या ये चालीस हजार रूपये टॅक्स जायेगा और सत्तर हजार रूपये अलग से देना है क्या. त्यावर गैरअर्जदार हे तक्रारदारास बराबर है बराबर है असे बोलले. त्यावर तक्रारदार यांनी तो सत्तर हजार मे सब आ जायेंगा ना केसकर साहब, गौरव वगैरे असे विचारले तेव्हा गैरअर्जदार बोलले की, सब, सब नंबर लेके गाडी उनके नाम कर दूंगा. बाद में कुछ नहीं टॅक्स छोड के सत्तर हजार देना है आपको बस. त्यावर तक्रारदार हे गैरअर्जदारास बोलले की, सभी आ गये ना, बाद मे ये नही बोलना त्यावर गैरअर्जदार तक्रारदारास बोलले की, सब, सब, ये जो टॅक्स रसीद रहेंगी वो रसीद छोडके सत्तर हजार लगेंगे आपको 2026 तक का टॅक्स भरूंगा जो पैसे लगेंगे उसको छोड कर सत्तर हजार लगेंगे. त्यानंतर तक्रारदार हे गैरअर्जदारास गौरव आया क्या मेरे को उससे बात करणी है असे बोलल्यावर गैरअर्जदार यांनी तक्रारदारास नही वो कुछ बात नही करेंगा मेरेसे जो बात हो गयी वो हो गयी. त्यावर गैरअर्जदार यांना रागात बोलुन म्हणाले की, मैने जो काम किया है वो पेपर मैं निकाल लेता हु. आप डायरेक्ट काम कर सकते, यहा पर सौ एजंट है. लेकीन घुम फिर के मेरे पास ही आना पड़ेगा. केसकर साहब, गौरव डायरेक्ट नहीं मांगते वो मेरे को ही बोलते है. दुसरे एक के रिनिव्हल के तिस हजार रूपये मांग रहे है पता है क्या आपको. और मै पहले पैसे नही लेता, आपका डिसक्लेमर हो जायेंगा उसके बाद मैं पैसे मांग लुंगा. अगर आज ब्राम्हणकर आता है तो ठिक है है नही तो साहब चले जायेंगे तो डायरेक्ट सोमवार को ही आयेंगे असे बोलुन गैरअर्जदार यांनी तक्रारदाराचे वाहनाचे हस्तांतरणाचे काम करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांचेकरीता लाच रक्कमेची मागणी करून काम झाल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली. तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री राजेश माहेश्वरी यांस प्रलंबित कामानिमीत्याने गैरअर्जदार श्री. केसकर किंवा श्री केसकर यांचेकरीता काम करणारा खाजगी व्यक्ती गौरव यांची भेट घालवुन देण्याबाबत विचारले असता गैरअर्जदार राजेश माहेश्वरी हे तक्रारदारावर चिडून आप अपने पेपर ले जा सकते हो वो डायरेक्ट बात नहीं करते है, वो मेरे को ही बताते है असे म्हटल्याने गैरअर्जदार श्री केसकर किंवा श्री केसकर यांचेकरीता काम करणारा व्यक्ती गौरव यांचे सोबत त्यांचे लाच मागणी पडताळणी करीता तक्रारदार गेले नाहीत. त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क. 1यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. त्यानंतर आमच्या सुचनेनुसार ना.पो.शि. सारंग बालपांडे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लॅपटॉपशी जोडून Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4427DRJGH15M मायक्रो एस.डी.कार्ड मधील फोल्डर -1 मध्ये रेकॉर्ड झालेली फाईल 251119_1310 ही कार्यालयीन लॅपटॉपवर खाजगी वाहनात बसुन कॉपी केली व रिव्हर्स व फारवर्ड करून आम्ही व दोन्ही पंचानी ऐकले व ऐकविली असता, आम्ही, तक्रारदार यांना विचारले की आपले लाच मागणीसंबंधाने संभाषण कुठून सुरू झाले त्यावर तक्रारदार यांनी आणखी पुढे चला असे म्हणुन तक्रारदार व गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांचेशी 09.09 पासुन ते 33.33 वा. पर्यत संभाषण झाल्याचे दिसुन आले. संभाषण रिव्हर्स फॉरवर्ड करून ऐकले व ऐकविले असता, पंच क्रमांक 1यांनी सांगितल्याप्रमाणे गै. अ. राजेश माहेश्वरीयांनी झालेल्या संभाषणादरम्यान त्यांनी तक्रारदार यांचेकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक

परिवहन अधिकारी गोंदिया यांचेकरीता लाच रक्कमेची मागणी करून काम झाल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना म्हटले की, आपण श्री. केसकर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांची आपल्या कामाकरीता लाचेची मागणी आहे किंवा कसे याकरीता गैरअर्जदार श्री. केसकर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांना प्रत्यक्ष भेटुन लाचेची मागणी बाबत भेट का घेतली नाही व संभाषणा दरम्यान गैरअर्जदार राजेश माहेश्वरी व आपण गौरव यांचेबाबत बोलले आहे ते गौरव कोण आहे याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष आम्हास सांगितले की, गौरव हा खाजगी व्यक्ती असुन तो गैरअर्जदार श्री. केसकर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे खाजगी कामे बघतो. मी गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना श्री. केसकर व गौरव यांचेशी भेट करून बोलणी करून दया असे विचारले असता त्यांनी रागावुन तक्रारदार यांना, ते डायरेक्ट भेटत नाही ते माझेकडून काम करून घेतात ते मलाच विचारतात असे म्हणुन तुम्हाला डायरेक्ट काम करायचे आहे तर तुम्ही तुमचे पेपर घेवुन जा असे बोलले. त्यावरून जर मी पुन्हा पुन्हा गैरअर्जदार केसकर किंवा गौरव यांना भेटण्यास विचारले असता गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना संशय आला असता व माझे कामाचे पेपर परत घेवुन त्यांनी माझेकडून मागीतलेली लाच रक्कम सुद्धा घेतली नसती. श्री केसकर किंवा गौरव हे डायरेक्ट भेटत नाही. जर मला राजेश माहेश्वरी यांनी त्यांची भेट घालुन दिली असती तर मी गैरअर्जदार केसकर किंवा त्यांचे काम करणारा खाजगी व्यक्ती गौरव यांचेशी भेट घेवुन बोलणी केली असती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारले की, पुरी बाबु नी पण आपणास लाचेची मागणी केली होती काय? त्यावर तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, त्यांना पुरी बाबु यांनी लाचेची मागणी केलेली नाही. लाच मागणी पडताळणी दरम्यान गैरअर्जदार यांनी तक्रारदारास काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारणार असल्याचे सांगितले असल्याने,दि. 19/11/2025 रोजी सापळा कार्यवाही होण्याची शक्यता नसल्याने पुढील सापळा कार्यवाही ही गैरअर्जदार श्री राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास कॉल करून तुमचे काम झाले आहे पैसे घेवुन या असे बोलल्यानंतर करण्याचे सर्वानूमते ठरविण्यात आले. गोंदिया येथून वेळ 16.05 वा. रवाना होवुन लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल नागपूर कार्यालयात वेळ 19.35 वा. पोहोचलो. कार्यालयात लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचे दरम्यान झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4427DRJGH15M मध्ये Private या फोल्डरच्या आत Sony या फोल्डर च्या आतील REC_FILE या फोल्डर मधील Folder 1 मध्ये 251119-1310या क्रमांकाच्या फाईलमध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषण पुर्वीच शासकिय लॅपटॉप मध्ये पोशि. होमेश्वर वाईलकर यांनी टंकलिखीत करून ठेवलेल्या स्क्रिप्टची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढून त्यावर दोन्ही पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली. सदर स्क्रिप्ट पंचनाम्यासोबत संलग्न करण्यात आली आहे. त्यांनतर मेमोरी कार्ड Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4427DRJGH15M मधील रेकॉर्ड फाईल क्र. 251119-1310या फाईलची SEVENZA Hash Calculator या अप्लीकेशन सॉप्टवेअरच्या MD5 Algorithm सहाय्याने हॅशव्हॅल्यु काढण्यात आली असता 251119-1310 ची हॅश व्हॅल्यु 88508511D2D7D952293A423373E0958B असे लॅपटॉपमध्ये सेव्ह असलेले हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्राची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढून त्यावर दोन्ही पंचांनी व नापोशि सारंग बालपांडे यांनी स्वाक्षरी केली. सदर हॅश व्हॅल्यू प्रमाणपत्र कार्यवाहीच्या कागदपत्रांसोबत संलग्न

करण्यात आले आहे. त्यानंतर लाच मागणी पडताळणी दरम्यान वापरण्यात आलेल्या Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4427DRJGH15M या मेमरी कार्डच्या वर्णनाचे कागदी लेबल व मेमोरी कार्डचे जप्तीपत्रक पुर्वीच शासकिय लॅपटॉप वर तयार करून असलेल्या लेबल व जप्तीपत्रकाची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढून त्यावर दोन्ही पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली. Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4427DRJGH15M या मेमरी कार्डच्या वर्णनाचे कागदी लेबल सिलबंद लिफाप्यावर चिटकविण्यात आले व त्यावर पेनने प्रदर्श P अशी निशाणी दिली. सदर लिफापा ताब्यात घेवुन सुरक्षीत ठेवण्यात आला. तक्रारदार व गै. अ. राजेश माहेश्वरीयांचेत लाचेच्या मागणी पडताळणी संभाषणादरम्यान गै.अ राजेश माहेश्वरी यांनीतक्रारदारास तक्रारदाराकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू, गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया व स्वतः करीता लाच रक्कमेची मागणी करून काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सापळा कार्यवाही ही गैरअर्जदार श्री राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास कॉल करून तुमचे काम झाले आहे पैसे घेवुन या असे बोलल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानूमते ठरवुन गोपनियता बाळगण्याची सुचना तसेच गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास कॉल करून बोलाविल्यास आमचेशी संपर्क करण्याच्या सुचना देवुन त्यांना त्यांचे घरी जाण्यास रवाना करण्यात आले. आम्ही दिनांक 24/11/2025 रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल, नागपूर कार्यालयात  हजर असतांना तक्रारदार श्री. सागर किशोर शाहाकार हे कार्यालयात हजर येवून आम्हास सांगितले की, तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री राजेश माहेश्वरी यांना दिनांक 24/11/2025 रोजी वाहनाचे हस्तांतरणाचे कामाबाबत कॉल केला होता. दि. 25/11/2025 रोजी गैरअर्जदार यांनी गोंदिया येथे बोलाविले असून वाहनाचे डिस्क्लेमर चे काम करून देतो त्यानंतर तुम्ही टॅक्स भरून घ्याल असे कळविले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच यांना मोबाईलवर संपर्क करून तक्रारदार यांनी आम्हास दिलेली माहिती दिली व दोन्ही पंचांना दिनांक 25/11/2025 रोजी सकाळी 07.00वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल कार्यालय नागपूर येथे कार्यवाहीच्या तयारी ने हजर राहण्याचे निर्देश दिले. दिनांक 24/11/2025 रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य तसेच तक्रारदार हे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, झिरोमाईल सिव्हिल लाईन नागपूर येथे आज दिनांक 25/11/2025 रोजी सकाळी वेळ 07.00 वाजता हजर आले. कार्यालयात आम्ही तक्रारदारास दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांचेसमक्ष सांगितले की, दिनांक 19/11/2025 रोजी गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी लाचेच्या मागणी पडताळणी दरम्यान आपणास आपल्याकडे काम असलेल्या जे.सी.बी. वाहन क्र. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 याचे हस्तांतरण करण्याकरीता शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांचेकरीता लाच रकमेची मागणी करून काम झाल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे परंतु गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी मागितलेल्या लाच रक्कम 70,000/-रू मध्ये गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचा वाटा आहे किंवा कसे? त्यांनी गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांना लाच रक्कम घेण्याकरीता प्रोत्साहन दिले आहे किंवा कसे? याबाबत गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी करणे आवश्यक आहे असे सांगितले. त्याप्रमाणे गोंदिया येथे गैरअर्जदारांसोबत प्रत्यक्ष भेटुन लाचेच्या

मागणी संबंधाने पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.गैरअर्जदार श्री. केसकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय उप प्रादेशिक कार्यालय गोंदिया यांची लाच मागणी पडताळणी करण्याकरीता दि. 25/11/2025 रोजी सकाळी 08/15 वा आम्ही, पंचनामा क.03 प्रमाणे रवाना होवून वेळ अंदाजे 12/05 वा. रवाना होवुन जिओ पेट्रोल पंप, आमगाव रोड, गोंदिया येथे वेळ 12/05 वा. पोहाचलो. तक्रारदार यांना गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना भेटण्याकरीता व तक्रारदाराचे कामाची प्रक्रीया कितपत झाली आहे याची माहिती घेण्याकरीता गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांचेकडे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे पाठविले असता तक्रारदार यांनी व्हॉट्सअँप वरून कॉल करुन आम्हास सांगितले की, गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी हे तक्रारदार यांना भेटले तक्रारदार यांनी डिस्क्लेमरचे काम झाले काय? आज होवुन जाईल काय असे विचारले असता गैरअर्जदार यांनी तक्रारदार यास सांगितले की, तुमची फाईल साहेबांचे टेबलवर ठेवली आहे साहेब थोडा वेळानी येणार आहे आले की, तुमचे काम होवुन जाईल, थोडा वेळ थांबुन राहा. त्यानंतर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय गोंदिया हे कार्यालयात हजर आल्याने तक्रारदार हे आम्ही थांबुन असलेल्या जिओ पेट्रोल पंप, आमगाव रोड, गोंदिया येथे परत आले.त्यानंतर गैरअर्जदार श्री. केसकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांची लाचेची मागणी पडताळणी करीता तक्रारदार यांना पंच क्र. 01 यांचेसह पाठविणे असल्याने, तक्रारदार यांना पंचनामा क्र.03 प्रमाणे सुचना देण्यात आल्या. आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील सदस्य नापोशि सारंग बालपांडे यांनी "सोनी" (मॉडेल क्र. ICD-PX470) कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415Hवर्णनाचे मेमोरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून, फॉर्मेट करुन रेकॉर्डीग मोडवर सुरू केले. पंच क्र.1 यांच्या आवाजात तक्रारदार श्री सागर शाहाकार यांचे सोबत गै.अ. यांचेकडे लाच रकमेची पडताळणी करण्याकरीता जात असल्याबाबत नाव व दिनांकासह संभाषण ध्वनीमुद्रीत करून मॅग्नेटिक सिल करून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया कडे जाण्याकरीता पायदळ रवाना करण्यात आले. आम्ही सापळा पार्टीतील चारचाकी वाहनात असलेले सदस्य व पंच क्र. 02 हे प्रादेशिक परिवहन कार्यालय जवळ बैंक ऑफ इंडीया, फुलचूर शाखा समोर मेन रोडवर गोंदिया परिसर येथे तक्रारदार व पंच क्र. 01 यांची परत येण्याची वाट पाहत चारचाकी वाहनात बसुन थांबुन राहीलो.

----------

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 01 हे आम्ही चारचाकी वाहनात प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया जवळ बँक ऑफ इंडीया, फुलचूर शाखा समोर मेन रोडवर थांबुन असलेल्या खाजगी चारचाकी वाहनाजवळ वेळ 17/20 वा. परत आले. त्यानंतर आम्ही पंच क.1 श्री. निखिल मेश्राम यांना तक्रारदार श्री. सागर शाहाकार व श्री. केसकर यांच्यात लाच रकमेबाबत झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र01 यांनी सांगितले की, मी तक्रारदारा सोबत गै.अ. केसकर यांना भेटण्यास उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय गोंदीया कार्यालयाचे आत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कक्षाकडे गेलो. कक्षाचे समोरच पोहचत असतांना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कक्षाचे दार उघडून एक व्यक्ती बाहेर आले त्यांची वेशभुषा पाहून ते एक वरीष्ठ अधिकारी असल्याचे दिसत होते. कक्षाचे बाहेरच तक्रारदार यांनी त्या व्यक्तीस नमस्कार सर म्हणाले व माझी वेस्ट बंगाल

मधुन आर. एम. ए. साठी एक फाईल दिलेली आहे सर असे बोलले. त्यावरून मी समजलो की, हाच व्यक्ती गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया आहेत. गैरअर्जदार यांनी सुद्धा तक्रारदार यांना नमस्कार म्हटले. त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. केसकर यांना त्यांचे कार्यालयातील तक्रारदाराचे कामाचे पुर्ण पेपर गहाळ झालेले होते पेपरचे काम माहेश्वरी भाऊला दिले आहे असे बोलले. माहेश्वरी यांचेसोबत सगळ बोलने झाले आहे त्यांचेसोबत आय.एफ.टी. साठी गाडी पण दाखविली आहे आज टॅक्स आणि डिस्क्लेमर साठी बोलवल होत त्यांनी असे बोलले. त्यावर गैरअर्जदार यांनी हं.. असे बोलले. त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. केसकर यांचेशी बोलले की, त्यांची अमाऊंट सत्तर हजार बोलले आहे असे बोलले. त्यावर गै.अ. केसकर म्हणाले की, बर बघतो मी, त्यात काय अडचण आहे बघतो मी, सांगितले आहे, तरी मदत करतो मी कन्फरमेशन आला आहे ना असे बोलले त्यावर तक्रारदार बोलले की, हो सर सगळं आलेलं आहे. माझे ईकडे येणे जमत नाही सर दहा वेळा आज टॅक्ससाठी बोलाविले आहे. त्यावर गै.अ. केसकर बोलले की, माहेश्वरी कडे आहे काय? त्यावर तक्रारदार हो सर बोलले. त्यावर गै.अ. केसकर हे तकारदारास बोलले की, ते आले होते, ठिक आहे बघतो मी. त्यावर तक्रारदार हे गै.अ. केसकर यांना बोलले की, माहेश्वरी बोलले सर मला सरांनी ऑर्डर दिला म्हणुन त्यावर गै.अ. केसकर बोलले की, दिली आहे न ठिक आहे सांगतो. त्यानंतर तिथे गै.अ. केसकर यांचेशी कामानिमीत्य दोन कार्यालयीन कर्मचारी आहे व गै.अ. केसकर व त्यांचेत कार्यालयीन कामाची बोलणी झाली. त्यानंतर ते दोन व्यक्ती गेल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. केसकर यांना बोलले की, सर एक रिक्वेस्ट आहे हात जोडून विनंती आहे त्यावर गै. अ. केसकर म्हणाले की, होईल मी त्याला देतो करून देतो ऑर्डर दिली आहे मी. असे बोलले त्यावर तक्रारदार हे गै.अ. केसकर यांना बोलले की, हो, ऑर्डर दिली आहे न सर, टॅक्सच्या व्यतिरीक्त सत्तर मध्ये बोलणे झालेलं आहे त्यांचे सोबत (म्हणजे गै.अ. माहेश्वरी सोबत) त्यावर  गै.अ. केसकर तक्रारदारास म्हणाले की, जे काही फिस असतील त्यांना सांगा, मी त्यांना सांगतो, मदत करून देतो ठिक आहे असे बोलले. त्यावर तक्रारदार हे गै.अ. केसकर यांना ठिक आहे असे बोलुन त्यांनतर गै.अ. केसकर हे कार्यालयाचे वरील माळ्यावर जाण्याकरीता पायरीने चडुन निघुन गेलेत. संभाषणा दरम्यान गै.अ. केसकर यांनी तक्रारदारास कोणतीही लाचेची मागणी केली नाही. परंतु गै.अ. राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास तक्रारदार यांचेकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लाच रक्कमेची मागणी केली आहे हे सांगुन सुद्धा गै.अ. केसकर यांना सदर बाब ही गैरकायदेशीर आहे असे बोलले नाहीत. यावरून गै.अ. राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास केलेल्या लाचेच्या मागणीबाबत गै.अ. केसकर यांना माहीत असल्याचे दिसुन आले आहे. त्यांनतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क.01 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. त्यानंतर आमच्या सुचनेनुसार ना.पो.शि. सारंग बालपांडे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लॅपटॉपशी जोडून Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H मायक्रो एस.डी. कार्ड मधील फोल्डर -1 मध्ये रेकॉर्ड झालेली फाईल 251125_1710 ही कार्यालयीन लॅपटॉपवर खाजगी वाहनात बसुन कॉपी केली व रिव्हर्स व फारवर्ड करून आम्ही व दोन्ही पंचानी ऐकले व ऐकविली असता, आम्ही, तक्रारदार यांना विचारले की आपले लाच मागणी संबंधाने संभाषण कुठून सुरू झाले त्यावर तकारदार यांनी आणखी पुढे चला असे म्हणुन तक्रारदार व गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांचेशी

04/32पासुन ते 06/08 वा. पर्यत संभाषण झाल्याचे दिसुन आले. संभाषण रिव्हर्स फॉरवर्ड करून ऐकले व ऐकविले असता, पंच क्रमांक 1 यांनी सांगितल्याप्रमाणे गै. अ. केसकर यांनी झालेल्या संभाषणा दरम्यान त्यांनी तक्रारदार यांचे कडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता कोणतीही लाचेची मागणी केलेली नसुन तक्रारदार यांनी गै.अ. केसकर यांना सांगितले की, गै.अ. माहेश्वरी यांनी त्यांना तक्रारदार यांचेकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लाच रकमेची मागणी केली आहे हे सांगुन सुद्धा ठिक आहे मी करून देतो, जे काही फिस असतील त्यांना सांगा मी त्याला सांगतो, मी मदत करून देतो, असे बोलुन गैरअर्जदार केसकर यांनी गै.अ. माहेश्वरी यांनी तक्रारदारास त्यांचेकडे काम असलेल्या जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे गै.अ. राजेश माहेश्वरी यांचे कृत्यास प्रोत्साहन दिल्याची खात्री केली.

दिनांक 19/11/2025रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान गैरअर्जदार यांनी तक्रारदारास काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारणार असल्याचे सांगितले असल्याने तसेच तक्रारदार यांचेकडे असलेल्या जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरणाची प्रक्रिया पुर्ण झालेली नसुन वाहनाचे डिस्क्लेमर ऑर्डर झाली नसल्याने, दिनांक 19/11/2025 रोजी सापळा कार्यवाही होण्याची शक्यता नसल्याने पुढील सापळा कार्यवाही ही गैरअर्जदार श्री राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास कॉल करून तुमचे काम झाले आहे पैसे घेवुन या असे बोलल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानूमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही पथकातील इतर सदस्य यांचेकडे रवाना होवुन पोलीस मुख्यालय गोंदिया जवळ मोकळया जागेत थांबुन असलेल्या गोंदिया कोहमारा रोड वरील जागेवर पोहाचलो. तेथे तक्रारदार श्री. सागर शाहाकार व गै.अ. श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांचे मध्ये झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकुन सदर संभाषणातील लाच मागणी पडताळणी संबंधाने घटनेशी लागू व ऐकीव संभाषणाचे शब्दशः टिपण (स्क्रिप्ट) खाजगी वाहनात शासकिय लॅपटॉप मध्ये पोशि. होमेश्वर वाईलकर यांनी टंकलिखीत केली.त्यानंतर वरीलप्रमाणे Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H या कंपनीचे मेमोरी कार्ड मध्ये रेकार्ड झालेली फाईल क्र. 251125-1710 मधील आवाज गै.अ. श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचाच आहे अगर कसे? याबाबत तज्ञाकडुन व्हॉईस स्पेक्टोग्राफी परिक्षण अहवाल प्राप्त करणे असल्याने सदर व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमोरी कार्ड आमचे सुचनेवरून नापोशि सारंग बालपांडे यांनी लॅपटॉपशी जोडून, सदर व्हाईस रेकॉर्डर मध्ये Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H मधील रेकॉर्ड फाईल क 251125-1710या फाईलचे SEVENZA Hash Calculator या अप्लीकेशन सॉफ्टवेअरच्या MD5 Algorithm सहाय्याने हॅशव्हॅल्यू काढण्यात आली असता 251125-1710 ची हॅश व्हॅल्यु 48387215480521063 2C5BD961F437B60 अशी निर्माण झाली. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर हे शासकिय लॅपटॉपशी वेगळे करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड बाहेर काढले. सदर मेमोरी कार्ड MZSandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H प्लास्टीकच्या केस मध्ये सुरक्षीत ठेवुन सदर मेमोरी कार्ड एका कागदी लिफाप्यात ठेवुन सदर लिफापा डिंकाने चिटकवुन सदर लिफापा लाखेच्या साहाय्याने शासकिय मोहर लावुन

सिलबंद करून त्यावर पेनने प्रदर्श P2 अशी निशाणी दिली. सदर नमुद लिफाफा ट्रॅपबॅगमध्ये ठेवुन नमुद ट्रॅपबॅग सुरक्षित ठेवण्यात आली. दिनांक 19/11/2025रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान गैरअर्जदार यांनी तक्रारदारास काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारणार असल्याचे सांगितले असल्याने तसेच तक्रारदार यांचेकडे असलेल्या जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरणाची प्रक्रिया पुर्ण झालेली नसुन वाहनाचे डिस्क्लेमर ऑर्डर झाली नसल्याने सर्वानुमते आम्ही पंच व सापळा पथकासह गोंदिया येथून रवाना होवून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल नागपूर कार्यालयात पोहोचलो. कार्यालयात लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व गैरअर्जदार केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचे दरम्यान झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H मध्ये Private या फोल्डरच्या आत Sony या फोल्डर च्या आतील REC FILE या फोल्डर मधील Folder 1 मध्ये 251125-1710 या क्रमांकाच्या फाईलमध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषण पुर्वीच शासकिय लॅपटॉप मध्ये पोशि. होमेश्वर वाईलकर यांनी टंकलिखीत करून ठेवलेल्या स्क्रिप्टची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढून त्यावर दोन्ही पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली. सदर स्क्रिप्ट पंचनाम्यासोबत संलग्न करण्यात आली आहे. त्यांनतर मेमोरी कार्ड Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H मधील रेकॉर्ड फाईल क 251125-1710या फाईलचे SEVENZA Hash Calculator या अप्लीकेशन सॉप्टवेअरच्या MD5 Algorithm सहाय्याने हॅशव्हॅल्यु काढण्यात आली असता 251125-1710 ची हॅश व्हॅल्यु 483872154805210632C5BD961F437B60 असे लॅपटॉपमध्ये सेव्ह असलेले हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्राची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढून त्यावर दोन्ही पंचांनी व नापोशि सारंग बालपांडे यांनी स्वाक्षरी केली. सदर हॅश व्हॅल्यू प्रमाणपत्र कार्यवाहीच्या कागदपत्रांसोबत संलग्न करण्यात आले आहे.त्यानंतर लाच मागणी पडताळणी दरम्यान वापरण्यात आलेल्या Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H या मेमरी कार्डच्या वर्णनाचे कागदी लेबल व मेमोरी कार्डचे जप्तीपत्रक पुर्वीच शासकिय लॅपटॉप वर तयार करून असलेल्या लेबल व जप्तीपत्रकाची प्रिंट शासकिय प्रिंटरच्या सहाय्याने काढून त्यावर दोन्ही पंचांनी व आम्ही समक्ष म्हणून स्वाक्षरी केली. Sandisk 32 GB Micro SDHC serial no 4242DVED415H या मेमरी कार्डच्या वर्णनाचे कागदी लेबल सिलबंद लिफाप्यावर चिटकविण्यात आले व त्यावर पेनने प्रदर्श P2 अशी निशाणी दिली. सदर लिफापा ताब्यात घेवुन सुरक्षीत ठेवण्यात आला. दिनांक 19/11/2025 रोजी तक्रारदार व गै. अ. राजेश माहेश्वरी यांचेत लाचेच्या मागणी पडताळणी संभाषणा दरम्यान गै.अ राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास तक्रारदाराकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व गैरअर्जदार श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांचेकरीता लाच रक्कमेची मागणी करून काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सापळा कार्यवाही ही गैरअर्जदार श्री राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास कॉल करून तुमचे काम झाले आहे पैसे घेवुन या असे बोलल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानूमते ठरवुन गोपनियता बाळगण्याची सुचना तसेच गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास कॉल करून बोलाविल्यास आमचेशी संपर्क करण्याच्या सुचना देवुन त्यांना त्यांचे घरी जाण्यास रवाना करण्यात आले. याबाबतच्या सर्व सविस्तर नोंदी पंचनामा क्र03 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.आम्ही दिनांक 02/12/2025 रोजी आमचे कार्यालयात येवून सांगीतले

की, तक्रारदार हा दिनांक 01/12/2025 रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, गोंदिया येथे गेले असता गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी याने तक्रारदार यास वाहनाचे डिस्क्लेमर काढुन दिले व तक्रारदार यास म्हटले की, जेव्हा टॅक्स भरणार तेव्हा तुम्ही माझे कडे या मी तुम्हाला केस काऊंटरवरून आय. डी. व पासवर्ड काढून देतो तुम्ही ऑनलाईन कुठे पण टॅक्स भरून घ्याल. त्यावर मी त्यांना दिनांक 04/12/2025 रोजी आपणास येवुन भेटतो तेव्हा तुम्ही मला केस काऊंटरवरून आय.डी. व पासवर्ड काढून दयाल मी टॅक्स ऑनलाईन भरून घेईल असे सांगुन निघालो असे सांगितले.

दिनांक 04/12/2025 रोजी सकाळी 07/00वा, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल कार्यालय नागपूर येथुन रवाना होवुन गोंदिया येथे सापऴा कारवाई करण्याचे ठरवुन तक्रारदार यांना कार्यालयास जाण्यास रवाना करण्यात आले. दिनांक 02/12/2025 रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही, सापळा पथकातील सर्व सदस्य, व तक्रारदार तसेच दिनांक 03/12/2025 रोजी केलेल्या दोन्ही पंचांच्या मागणी प्रमाणे दोन्ही पंच हे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, झिरो माईल, नागपूर येथे वेळ 07/00 वाजता हजर आले.सापळा कार्यवाही करण्याकरीता आज दि. 04/12/2025 रोजी सकाळी 07/45 वा आम्ही, ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टॉर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, 0 कोऱ्या मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, लाच रकमेचा लिफाफा, व स्टेशनरी साहीत्य बरोबर ठेवुन असल्याची खात्री केली. शासकिय लॅपटॉप, दोन खाजगी लॅपटॉप, लॅपटॉपचे चार्जर, प्रिन्टर, इत्यादी साहित्य त्यांचे जोडणीसह सोबत घेवून, तक्रारदार, पंच क्र 01व आम्ही तसेच सापळा पार्टीतील सदस्य पोनि. जितेंद्र वैरागडे, नापोशि सारंग बालपांडे, असे पोनि. जितेंद्र वैरागडे यांचे खाजगी चारचाकी वाहनाने तसेच पंच क्र.02 मपोहवा अस्मिता मेश्राम, पोशि होमेश्वर वाईलकर, पोशि प्रफुल भातुलकर असे शासकिय वाहन क. एम.एच. 31, डी.झेड 0473चे चालक नापोशि राजेंद्र जांभुलकर यांचेसह लाचलूचपत प्रतिबंधक विभाग झिरो माईल नागपूर कार्यालयातुन गोंदिया येथे जाणेकरीता रवाना होवुन जिओ पेट्रोल पंप, आमगाव रोड, गोंदिया येथे पोहचलो.गैरअर्जदार राजेश माहेश्वरी हे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे आले असावे याकरीता तक्रारदार यांना गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना भेटण्याकरीता व गैरअर्जदार यांचेकडून वाहनाचे डिस्क्लेमरचा आर्डर घेवुन गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचे सोबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदियाचे केस काऊंटरवर जावुन पासवर्ड व आय.डी. प्राप्त करून वाहनाचा टॅक्स भरून टॅक्स भरल्यानंतर गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना लाच रक्कम घेवुन येतो असे सांगण्याकरीता गैरअर्जदार श्री. केसकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया हे कार्याल्यात हजर आहे किंवा कसे हे पाहण्याकरीता पाठविणे असल्याने तक्रारदार यास उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे. पाठविले असता काही वेळानंतर आम्हास तक्रारदार यांनी त्यांचे व्हॉट्सअँप वरून कॉल केला आम्ही मोबाईल स्पिकर मोडवर ठेवुन दोन्ही पंचासमक्ष तक्रारदाराशी बोलणी केली तक्रारदार यांनी आम्हास सांगितले की, गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी हे मला भेटले मी त्यांना डिस्क्लेमर देवुन दया त्याप्रमाणे मी वाहनाचे आनलाईन टॅक्स भरून घेतो असे सांगितले त्यावरून गैरअर्जदार राजेश माहेश्वरी मला म्हणाले की आधी केस काऊंटरून आय. डी. व पासवर्ड घेवुन त्यानंतर ऑनलाईन टॅक्स भरा लागते थोडावेळ थांबुन जा मी दुकानातुन वाहनाचे कागदपत्रांची फाईल घेवुन येतो असे सांगुन गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी हे त्यांचे दुकानाकडे निघाले मी पण त्यांचे सोबत त्यांचे दुकानात गेलो त्यांना त्यांनी त्यांचे दुकानात ठेवलेली जे.सी. बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम.

4389 चा कागदपत्रांची फाईल घेतली व मी व गैरअर्जदार हे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथील केस काऊंटरवर गेलो तेथे केस काऊंटर वरील व्यक्तीला त्यांनी डिस्क्लेमरचा कागद दिला व केस काऊंटरवरील व्यक्तीने पेनानी त्यांना नंबर टाकुन वाहनाचा डिस्क्लेमरचा कागद गैरअर्जदार यांना परत दिला. गैरअर्जदार यांनी मला डिस्क्लेमरचा कागद दाखवला व त्यांची फोटो काढण्यास सांगितले व पेनानी लिहीलेला अप्लीकेशन नंबर 252770962 आहे तो ऑनलाईन सर्विस सेंटर येथे जावुन त्यांना हा नंबर सांगुन वाहनाचे टॅक्स भरून घ्या व भरलेल्या टॅक्स पावतीची कॉपी मला आनुन दया. असे सांगुन गैरअर्जदार हे निघुन गेले. मी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया जवळ असलेल्या पी.यु.सी. सेंटरवरून जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 चा हस्तांतरण करण्याकरीता ऑललाईन पोर्टलवर वाहनाचे टॅक्स 44113/-रू दिसत असल्याने मी सदर वाहन टॅक्स ऑनलाईन भरून टॅक्स पावती प्राप्त केली. सदर पावतीची एक झेरॉक्स काढुन मी एक पावती गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना दिली आहे. रक्कम थोड्यावेळात घेवुन येतो असे सांगून आम्ही थांबुन असलेले ठिकाणी तक्रारदार हे परत आले तसेच सापळा पथकातील उर्वरीत सदस्य हे आमचे सुचनेप्रमाणे जिओ पेट्रोल पंप, आमगाव रोड, गोंदिया येथे हजर आले.त्यानंतर गैरअर्जदार खाजगी व्यक्ती श्री. राजेश माहेश्वरी यांचेकडे लाच रक्कम घेवुन पाठवुन सापळा कार्यवाही करीता तक्रारदार यांना पंच क्र.1 यांचेसह पाठविणे असल्याने, तक्रारदार यांची सापळा कार्यवाही पूर्वीची अंगझडती घेण्यात आली. तसेच तक्रारदार व पंच यांना पंच क्र.04प्रमाणे सापळा पूर्वीची सुचना देण्यात आल्या.त्यानंतर प्रात्यक्षीक पंचनाम्याप्रमाणे एका कागदी लिफाप्यात ठेवलेला एक अँन्थ्रासीन पावडर लावलेला लिफाप्यात ठेवुन असलेल्या अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या 500 रू. दराच्या 20नोटा असे 10,000/-रू व उर्वरीत 60,000/-रू हे 500/-रू दराच्या 120 भारतीय बच्चो का बॅक असे लिहुन असलेल्या बनावट नोटा एकुण 70,000/-रू तयार केलेला बंडल असलेला लिफाफा तक्रारदार यांनी परिधान केलेल्या जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यात गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांना लाच रक्कम देण्याकरीता अलगत ठेवला.त्यानंतर तक्रारदार सागर शाहाकार यांना गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांचकडे लाच रक्कम घेवून रवाना करणे असल्याने,आमचे सुचने वरून सापळा पथकातील सदस्य नापोशि सारंग बालपांडे यांनी "सोनी" (मॉडेल क्र. ICD-PX470) कंपनीच्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर त्यामध्ये Sandisk 32 GB Micro SDHC card Serial No. 4242DVED4119BM या कंपनीचे वरील वर्णनाचे मेमोरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून, फॉरमेट करुन, रेकॉडींग मोडवर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंच क्र01 श्री. निखील मेश्राम यांच्या आवाजात त्यांचे नाव व दिनांकासह सेट करून वेळ 15/42 वाजता सुरु केला. त्यानंतर पंच क्र. 1 तक्रारदारासोबत गैरअर्जदार खाजगी व्यक्ती राजेश माहेश्वरी यांचेकडे प्रत्यक्ष लाचरक्कम देण्याकरीता जात असल्याबाबत, पंच क्रमांक 1 यांचे संभाषण ध्वनीमुद्रीत करून गै.अ. राजेश माहेश्वरी यांच्याकडे लाच रक्कम देण्याकरीता सापळा पथकातील सदस्य जितेंद्र वैरागडे यांचे खाजगी चारचाकी वाहनाने आम्ही, दोन्ही पंच, पोनि. जितेंद्र वैरागडे, नापोशि सारंग बालपांडे असे शासकिय वाहनात बसुन असलेले सापळा पथकातील उर्वरीत सदस्य शासकिय वाहनाने जिओ पेट्रोल पंप, आमगाव रोड, गोंदिया येथुन रवाना होवुन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, गोंदिया जवळ बँक ऑफ इंडीया, फुलचूर शाखा समोर मेन रोडवर चारचाकी वाहन थांबविले. त्यातुन तक्रारदार व पंच क्र.01 हे उतरून त्यांना उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया कडे जाण्याकरीता पायदळ रवाना करण्यात आले. तक्रारदार व पंच क्र.01 हे उपप्रादेशिक

परिवहन कार्यालय गोंदिया समोर असलेल्या ऑनलाईन सर्वीसच्या दुकानात ज्यावर कैलास माहेश्वरी असे पेन्टनी लिहीलेल्या व दुकानाचे वरील बाजुस हार्दीक ड्रायव्हींग स्कुल असा बोर्ड असलेल्या दुकानाचे समोरून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर कॉल केला व कैलास माहेश्वरी लिहून असलेल्या दुकानात पंच क्र.01 यांचेसह आत गेले. थोड्या वेळात दुकानातुन तक्रारदार हे पंच क्र.01 यांचेसह बाहेर आले.त्यांचे सोबत एक सळपातळ बांध्याच्या ज्यांनी हिरवट पांढरे रंगाचे चेक्सचे फुल बाहयाचे शर्ट व क्रिम रंगाचा फुलपॅट परिधान केलेला व्यक्ती बाहेर आला ते बोलत बोलत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया चे मेन गेटच्या आत गेले. तेथे पार्कीग परीसरात बोलत राहीले. तक्रारदार व पंच क्र.01 व त्यांचे सोबत असलेला सोबत एक सळपातळ बांध्याच्या ज्यांनी हिरवट पांढरे रंगाचे चेक्सचे फुल बाहयाचे शर्ट व क्रिम रंगाचा फुलपॅन्ट परिधान केलेला व्यक्ती हे आम्हास, पंच क्र.0 2 व सापळा पथकातील घटणास्थळी हजर असलेल्या सदस्य यांना स्पष्ट दिसुन येत होते. तक्रारदार यांचे सोबत बोलत असलेला व्यक्ती हा आम्हास, पंच क्र.02 व हजर असलेले सापळा पथकातील सदस्य यांना गैरअर्जदार राजेश माहेश्वरी असु शकतो असे वाटु लागले. त्यांनतर तक्रारदार श्री. सागर शाहाकार व त्यांचे सोबत बोलत असणारा व्यक्ती हे एकमेकां सोबत बोलतांना दिसले त्यानंतर बोलतांना तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांनी परिधान केलेले जिन्स पॅन्टच्या समोरील उजवे खिश्यात आपला उजवा हात टाकला व त्यातुन लाच रकमेचा लिफाफा काढुन गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचेकडे दिली असता गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांनी सदर लाच रक्कम आपले उजवे हातानी स्विकारून त्यांचे डाव्या हातात घेवुन त्यांचे उजवे हातानी अँन्थ्रॉसीन पावडर लावलेल्या लिफाप्यातुन अँन्थ्रॉसीन पावडर लावलेला लाच रक्कमेचा बंडल आपले उजवे हातानी बाहेर काढला व मोजु लागले.त्यानंतर लगेच नियोजित ईशाऱ्यान्वये वेळ 15/53वा. तक्रारदार श्री. सागर शाहाकार त्यांचे सोबत बोलत असलेल्या व्यक्ती जवळूनच नियोजीत ईशारा करून त्यांनी डोळयावर घातलेला गॉगल आपले उजवे हातात घेतला. तेव्हा आमची खात्री झाली की, हाच गैरअर्जदार राजेश माहेश्वरी असुन त्यांनीच लाच रक्कम स्विकारली आहे. आम्ही, पंच क्र02 सापळा पथकातील सर्व सदस्य लगेच तक्रारदार पंच क्र01 व गै.अ. उभे असलेल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया ईमारती समोरील पार्कीग परिसरात पोहोचलो. तेथे आम्ही व सापळा पथकातील सदस्यांनी गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचा घेराव करून आम्ही पंच क्र01यांना लाच रक्कम कोणी स्वीकारली आणि कुठे ठेवली असे इशाऱ्याने विचारले असता, त्यांनी थोडे बाजुस येवुन सांगितले की, तक्रारदार सागर शाहाकार यांचे सोबत बोलत असलेला हिरवट पांढरे रंगाचे चेक्सचे फुल बाहयाचे शर्ट व क्रिम रंगाचा फुलपॅट परिधान केलेला व्यक्ती हाच गैरअर्जदार राजेश माहेश्वरी आहे. तक्रारदार यांनी आपल्या जिन्स पॅन्टच्या समोरील खिश्यातुन आपल्या उजव्या हातानी लाच रक्कमेचा लिफाफा काढुन गैरअर्जदार रोजश माहेश्वरी यांचे कडे दिली असता गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांनी सदर लाच रक्कम आपले उजवे हातानी स्विकारून त्यांचे डाव्या हातात घेवुन त्यांचे उजवे हातानी अँन्थ्रॉसीन पावडर लावलेल्या लिफाफ्यातुन अँन्थ्रॉसीन पावडर लावलेला लाच रक्कमेचा बंडल आपले उजवे हातानी बाहेर काढला व मोजु लागले होते. असे सांगितले. त्यानंतर आम्ही सापळा रक्कम गैरअर्जदार यांचेकडून पंच क्र.02 यांचे हस्ते ताब्यात घेण्याचे पुर्वी आमचे दोन्ही पंच व सापळा पथकातील हजर असलेले सर्व सदस्यांचे एक एक करून काळया कपडयाच्या अंधार करून अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता कोणाचेही हातावर हिरवटसर रंगाची चकाकी दिसुन आली नसल्याची गैरअर्जदार यांना खात्री

करून दिली. गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचे डावे हातात लाच रक्कमेचा लिफापा व उजवे हातात लाच रक्कमचा बंडल असा दिसुन आल्याने त्यानंतर सदरची लाच रक्कम व लाच रक्कमेचा लिफापा पंच क्र.02 यांना गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचे हातातुन ताब्यात घेण्यास सांगितल्यावरून पंच क्र.02 यांनी आमचे सूचनेप्रमाणे गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचे डाव्या हातातुन लाच रक्कमेचा लिफापा व उजवे हातातुन लाच रक्कम ताब्यात घेवुन लाच रक्कमेचा लिफाप्यात लाच रक्कमेचा बंडल टाकुन ताब्यात घेतला.त्यानंतर थोड्या अंतरावर उभे असलेले तक्रारदार यांना त्यांचेकडे असलेले डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर घेवुन बोलावुन त्यांचेकडून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सापळा पथकातील सदस्य नापोशि सारंग बालपांडे यांनी घेवुन पंच क्र.01 यांचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर आमचे सुचनेवरून सापळा पथकातील सदस्य नापोशि सारंग बालपांडे यांचेद्वारे बंद करण्यात आला.आम्ही गैरअर्जदारास तेथेच शांतपणे उभे राहण्यास सांगितले. यानंतर आम्ही गैरअर्जदार यांना आमचा तसेच सापळा पार्टीतील सदस्यांचा व दोन्ही पंचाचा परिचय दिला. त्यावेळी ते घाबरले. आम्ही त्यांना सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगीतले. त्यानंतर गैअर्जदारास त्यांचे संपूर्ण नाव, पद पत्ता इ. माहिती देण्याबाबत सांगीतले असता त्यांनी आपले नाव श्री. राजेश रामनिवास माहेश्वरी, वय 57वर्ष व्यवसाय-पी.यु.सी. सेंटर चालक रा. मनोहर कॉलोनी रोड, काली माता मंदीर जवळ, रामनगर, गोंदिया असे सांगीतले ते नोंद करण्यात आले. आरोपी पळून जावू नये याकरिता पंच, सापळा पार्टी सदस्य यांना सतर्कतेबाबत सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर पुन्हा गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांचेकडून लाच रक्कम ताब्यात घेतल्यानंतर आम्ही पंच क्र.01 व सापळा पथकातील सर्व सदस्याची व आमचे हात काळा कपडयाने अंधार करून, अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासले असता कोणती संशयास्पद व अँन्थ्रासिन पावडर लागली नसल्याचे दोन्ही पंचा समक्ष पडताळून पाहली असता, अँन्थ्रासिन पावडर लागली नसल्याचे, दोन्ही पंच व आमचे निदर्शनास आले. त्यांनतर पंच क्र.02यांनी सदर लाच रक्कम ताब्यात घेतल्याने पंच क्र.02 यांचे दोन्ही हात आम्ही काळा कपडा अंगावर धरून अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासल्या असता पंच क्र.02 यांचे दोन्ही हातावर हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर आम्ही काळा कपडा अंगावर धरून अंधार केला व त्या अंधारात लाच रक्कम ठेवुन असलेला लिफापा व लाचेच्या नोटा अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासल्या असता सदर नोटांवर हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन आल्याचे दोन्ही पंचाचे व आमचे निदर्शनास आले. तसेच गैरअर्जदार यांचे उजव्या व डाव्या हाताची बोटे अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात तपासली असता गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर व तळ हातावर हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन आली.यानंतर आम्ही बाजूला थोड्या अंतरावर उभे असलेले तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांना आवाज देवून आमचे जवळ बोलावून घेतले. त्यानंतर काळया कपडयाच्या अंधार करुन तक्रारदार यांचे दोन्ही हाताची बोटे अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासली असता तक्रारदाराच्या उजव्या हातांच्या बोटांवर हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच तक्रारदार यांनी परिधान केलेले जिन्स पॅन्टचा समोरील उजवा खिसा अंधार करुन अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासला असता जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्याचा आतील व काठावरच्या बाजुस हिरवळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदाराची सापळ्या नंतरची अंगझडती दोन्ही

पंचासमक्ष घेतली असता त्यांचे जवळ सापळयापुर्वीच्या अंगझडती यादी दरम्यान मिळून आलेल्या सर्व चिजवस्तू बरोबर असल्याचे आढळून आल्या. तक्रारदार यांची हस्तलिखीत सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती यादी तयार करून, अंगझडतीत मिळून आलेले चिज वस्तु व रोख बाबत अंगझडतीत नमुद करण्यात आले. अंगझडती यादीवर तक्रारदार व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली. अंगझडती मध्ये मिळून आलेले चिज वस्तू तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांना वेळीच परत करण्यात आली. त्यानंतर आम्ही आरोपी राजेश माहेश्वरी यांना तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांचेकडे असलेल्या जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 चा कागदपत्रांची फाईल कुठे आहे असे विचारले असता आरोपी राजेश माहेश्वरी यांनी माझे दुकानात ठेवली आहे असे सांगितले तेव्हा आम्ही राजेश माहेश्वरी यांना त्यांचे दुकानात घेवुन जाण्यास सांगितले असता त्यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया समोर असलेली रोडाचे पलीकडले कैलास माहेश्वरी असे पेन्टनी लिहीलेल्या व दुकानाचे वरील बाजुस हार्दीक ड्रायव्हींग स्कुल असा बोर्ड असलेल्या दुकानात घेवुन गेले दुकानातुन एका टेबलमागे ठेवुन असलेली एक कागदी फाईल आम्हास दिली सदर फाईल पाहली असता सदर फाईलमध्ये तक्रारदार श्री. सागर शाहाकार यांचेकडे असलेल्या जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 चा कागदपत्रे मुळ व छायांकित कागदपत्रे पंचनामा क्रमांक 04 मध्ये नमुद केल्याप्रमाणे दिसुन आली. नमुद कागदपत्रांची जप्तीपत्रक शासकिय लॅपटॉपवर तयार करून त्यांची प्रिंट काढून आरोपी राजेश माहेश्वरी यांचेकडून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले.

त्यानंतर आरोपी राजेश माहेश्वरी यांना घेवुन दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांचे सह आलोसे श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कक्षात जावुन तेथे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचे कक्षात गेलो असता तिथे अधिकारी खुर्चीवर एक व्यक्ती हजर मिळून आले त्यांना आम्ही आमचा, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य यांचा परिचय करून दिला. त्यानंतर आम्ही त्या व्यक्तीस त्यांचे संपूर्ण नाव, पद पत्ता इ. माहिती देण्याबाबत सांगीतले असता त्यांनी आपले नाव श्री. राजेंद्र सदाशिव केसकर, वय 53 वर्ष पद-सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया रा. ह.मु. श्री कापगते सर, शास्त्रीवार्ड यांचे घरी किरायाने, गोंदिया मूळ पत्ता फ्लॅट क. 501, गगन @ 33, बाणेर मालपाणि बिल्डींग जवळ, पूणे असे सांगीतले ते नोंद करण्यात आले. त्यानंतर आम्ही त्यांना सांगितले की, गै. अ. राजेश माहेश्वरी यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार श्री. सागर शाहाकार यास तक्रारदार यांचेकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व आपल्याकरीता लाच रकमेची मागणी करून काम झाल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच गैरअर्जदार यांचे या कृत्यास आपण प्रोत्साहन दिले आहे तेव्हा आपण कार्यवाहीस सहकार्य करा असे सांगितले.

त्यानंतर आरोपी राजेद्र केसकर व आरोपी राजेश माहेश्वरी यांची पंच क्र.01 यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती घेण्यात आली. नमुद आरोपींतांकडून पंचनामा क्र.04 मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुददेमाल मिळून आल्याने स्वतंत्र जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आला. त्यानंतर

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे सदर अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या नोटाचे क्रमांक पंच क्र.01 श्री. निखील मेश्राम यांनी वाचले व पंच क्र.02 जितेंद्र पवार यांनी प्रात्यक्षीक पंचनामा मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता त्या नोटांचे क्रमांक सापळा कार्यवाही पंचनाम्यात नमुद केल्याप्रमाणे दिसुन आले.

उपरोक्त नोटांचे क्रमांक हे प्रात्यक्षीक पंचनामा मध्ये नमूद असलेल्या नोटांच्या क्रमांकाशी तंतोतंत जुळुन आले. सदर नोटा वेगळया जप्तीपत्रकाप्रमाणे आरोपी खाजगी इसम राजेश माहेश्वरी यांचे कडून जप्त करण्यात आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र.01 यांना घटनाक्रमाविषयी विचारणा केली असता पंच क्र.01 यांनी सांगितले की तक्रारदार हे मला उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया समोर असलेल्या ऑनलाईन सर्वीसच्या दुकानात ज्यावर कैलास माहेश्वरी असे पेन्टनी लिहीलेल्या व दुकानाचे वरील बाजुस ड्रायव्हींग स्कुल असा बोर्ड असलेल्या आरोपी राजेश माहेश्वरी यांचे दुकानाचे समोर घेवुन आले. तेथुन तक्रारदार यांनी राजेश माहेश्वरी यास मोबाईल क्रमांकावर फोन लावुन मोबाईल लाऊड स्पिकर मोडवर ठेवला आरोपी राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला तक्रारदार हे आरोपी राजेश माहेश्वरी यांना बोलले की, कहा हो भैय्या त्यावर राजेश माहेश्वरी तक्रारदारास बोलले की, दुकान मे, त्यावर तक्रारदार हे म्हणाले की, आवो ना बात करते है पावती लेलो त्यावर राजेश माहेश्वरी बोलले की, दुकान पे आवो काम चल रहा है. त्यानंतर तक्रारदार यांनी मोबाईल कट करून तक्रारदार व मी, आरोपी राजेश माहेश्वरी यांचे दुकानात गेलो. आरोपी राजेश माहेश्वरी हे त्यांचे दुकानात बसले होते तक्रारदार हे आरोपी राजेश माहेश्वरी यांना बोलले की, पैसे आणल्याचा ईशारा करून ये लेलो भैय्या बहोत धन्यवाद असे बोलले तक्रारदार यांनी आरोपी राजेश माहेश्वरी यांना बाहेर येण्याचा ईशारा केल्याने आरोपी माहेश्वरी हे दुकानाचे बाहेर आले. तक्रारदार व आरोपी माहेश्वरी हे बोलत बोलत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदियाचे परिसराचे मुख्य गेटच्या आत मधील पार्कींग कडे गेले आरोपी राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदारास बीस हजार रूपये दे अभी असे म्हटले त्यावर बाकी के उसके पास जमा कर दो त्यावर तक्रारदार यांनी ब्राम्हणकर असे बोलले त्यावर आरोपी माहेश्वरी म्हणाले की, ब्राम्हणकर की गाडी आयेगी जब मैं बुलालुंगा, पैसे उससे पास मंगा लुंगा, जिस दिन गाडी बुलाऊंगा और बोलना अभीच गाडी दिखाना है असे बोलले. त्यावर तक्रारदार यांनी आरोपी माहेश्वरी यास बोलले की अभी बिस हजार जमा करना है त्यावर तक्रारदार आरोपी माहेश्वरी यांना बोलले की, मै पुरे पैसे लाया असे बोलल्यावर तक्रारदार यांनी आपल्या उजवे हातानी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या जिन्स पॅन्टच्या समोरील उजवे खिश्यात लाच रक्कमेचा लिफापा आरोपी माहेश्वरी यांचेकडे दिला असता आरोपी माहेश्वरी यांनी लाच रक्कमेचे लिफापा आपले उजवे हातानी स्विकारून त्यांचे डाव्या हातात घेवुन लिफाप्यातील लाच रक्कमेचा बंडल आपल्या उजव्या हातानी काढुन हातात धरून आरोपी राजेश माहेश्वरी तक्रारदारास बोलले की, ये साहब के ईसमे दिखा के खतम कर दूंगा, ईस महीनेमे उसका नंबर दे दूंगा, असे बोलले, तक्रारदार यांनी हे ठीक है आपने जो बोले थे पुरे सत्तर हजार गिन लेना असे बोलल्यावर आरोपी माहेश्वरी लाच रक्कम मोजु लागले तेव्हा तक्रारदार यांनी नियोजीत ईशारा करून त्यांनी त्यांचे डोळयावर घातलेला गॉगल आपले उजवे हातात घेतला,

तेव्हा आपण येवुन पुढील कार्यवाही केली असे पंच क्र.1 यांनी आम्हा, पंच क.2 व सापळा पथका समक्ष कळविले. त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र.01 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया हे शासकिय कार्यालय असल्याने सदर ठिकाणी लोकांची कामकाज करण्याकरीता अडथळा निर्माण होत असल्याने, पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया कार्यालय येथे करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. तसेच लाच रक्कम गैरअर्जदार श्री. राजेश माहेश्वरी यांनी स्विकारली असल्याने, तसेच आलोसे श्री. केसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांना गुन्हयास प्रोत्साहन दिल्याने दोन्ही आरोपीस आम्ही शासकिय वाहनात बसवुन, सापळा पार्टीतील सदस्य व पंचासह आम्ही खाजगी चारचाकी वाहनाने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय गोंदिया येथुन वेळ 18/15 वा. रवाना होवुन, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय, गोंदिया येथे पुढील कार्यवाही करीता वेळ 18/30 वा. घेवुन आलो.

यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून त्यामध्ये गैरअर्जदार राजेश माहेश्वरी व तक्रारदार यांचे सापळा कार्यवाही दरम्यान जे संभाषण ध्वनीमुद्रीत झाले ते संभाषण व्हाईस रेकॉर्डरच्या स्पिकरचे सहाय्याने ऐकुन ते संभाषण एका कागदावर म.पो. हवा. अस्मीता मेश्राम यांनी शब्दशः टिपण तयार करून ते संगणकावर म.पो.हवा. अस्मीता मेश्राम यांनी टंकलिखित केले. सदरचे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी कार्ड Sandisk 32 GB Micro SDHC card Serial No. 4242DVED4119 BMमध्ये Folder 1 मधील 251204_1542या क्रमांकाच्या फाईलमध्ये ध्वनीमुद्रीत झाले ते पंचनामा क्र.04 मध्ये नमुद केल्याप्रमाणे आहे. त्यानंतर Sandisk 32 GB Micro SDHC card Serial No. 4242DVED4119 BM या कंपनीचे मेमरी कार्ड मध्ये रेकार्ड झालेली फाईल क. 251204_1542मधील आवाज राजेश माहेश्वरी यांचाच आहे अगर कसे? याबाबत तंज्ञाकडुन व्हॉईस स्पेक्टोग्राफी परिक्षण अहवाल प्राप्त करणे असल्याने सदर व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमोरी कार्ड नापोशि. सारंग बालपांडे यांनी संगणकाशी जोडून सदर व्हाईस रेकॉर्डर मधील Sandisk 32 GB Micro SDHC card Serial No. 4242DVED4119 BM मधील रेकॉर्ड फाईल क्र.251204_1542या फाईलचे SEVENZA Hash Calculatorया अप्लीकेशन सॉप्टवेअरच्या MD5 Algorithm सा हयाने ॅंश व्हॅल्यु नापोशि. सारंग बालपांडे यांचेद्वारे काढण्यात आली असता 251204_1542ची हॅश व्हॅल्यु 440BC4704CDF3D261607969FB4DBC86B अशी निर्माण झाली. यानंतर व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड बाहेर काढले. सदर मेमोरी Sandisk 32 GB Micro SDHC card Serial No. 4242DVED4119 BMअसे लिहले आहे. सदर मेमोरी कार्ड एका कागदाचे पाकीटात एका प्लास्टीक केस मध्ये सुरक्षीत ठेवण्यात आले. सदर पाकीटावर प्रदर्शS असे प्रदर्श लिहून व मेमरीकार्डचे विवरण लिहुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचाच्या सही चे लेबल सदर पाकीटावर चिटकविण्यात आले व सदर पाकीटाला डिकांने चिपकवुन लाखेचे सिल लावून लिफापा सिलबंद करण्यात आला. सदर मेमोरी Sandisk 32 GB Micro SDHC card Serial No. 4242DVED4119 BM मेमरीकार्डचे विवरणाचे जप्तीपत्रक तयार करून जप्त केले. तरी आरोपी खाजगी इसम राजेश माहेश्वरी यांनी तक्रारदाराकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व आलोसे श्री. राजेंद्र केसकर, प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया यांचेकरीता लाच रक्कमेची मागणी करून तक्रारदार

यांचे प्रलंबित काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे काम करून देण्यासाठी गैरअर्जदार राजेश माहेश्वरी यांनी 70,000/-रु. लागतील असे गै.अ.श्री. राजेंद्र केसकर यांना सांगीतल्यानंतर त्यांनी बघतो, मदत करतो असे बोलुन तसेच तक्रारदार यांनी टॅक्स व्यतीरीक्त सत्तर असे सांगीतल्यानंतरही गैरअर्जदार श्री. केसकर यांनी त्यास मदत करून देतो असे बोलुन गै.अ. माहेश्वरी यांनी तक्रारदारास त्यांचेकडे काम असलेल्या जे.सी.बी. वाहन क. डब्लू.बी. 34 बी.एम. 4389 या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे गै.अ. राजेश माहेश्वरी यांचे कृत्यास स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता प्रोत्साहन दिले. दि.04/12/2025 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान राजेश माहेश्वरी यानी लाच रक्कम 70,000/- रूपये तक्रारदार यांचे कडून पंचासमक्ष स्विकारल्याने आरोपी राजेश रामनिवास माहेश्वरी, वय 57 वर्ष व्यवसाय-पी.यु.सी. सेंटर चालक रा. मनोहर कॉलोनी रोड, काली माता मंदीर जवळ, रामनगर, गोंदिया व आलोसे राजेंद्र सदाशिव केसकर, वय 53वर्ष पद-सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया रा. ह.मु. श्री कापगते सर, शास्त्रीवार्ड यांचे घरी किरायाने, गोंदिया मूळ पत्ता फ्लॅट क. 501, गगन @ 33, बाणेर मालपाणि बिल्डींग जवळ, पूणे यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 सुधारणा 2018कलम 7अ,12 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.

अपराध क्रमांक - 697/ 2025 कलम 7अ,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 सुधारणा 2018

फिर्यादी – अनिल मोहनरेड्डी जिट्टावार, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस उपअधिक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर,

मो.क. 9823270581

आरोपी – 1) राजेंद्र सदाशिव केसकर, वय 53वर्ष पद-सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदिया

रा. ह.मु. श्री कापगते सर, शास्त्रीवार्ड यांचे घरी किरायाने, गोंदिया मूळ पत्ता फ्लॅट क. 501, गगन @ 33, बाणेर मालपाणि बिल्डींग जवळ, पूणे

2)राजेश रामनिवास माहेश्वरी, वय 57 वर्ष व्यवसाय-पी.यु.सी. सेंटर चालक रा. मनोहर कॉलोनी रोड, काली माता मंदीर जवळ, रामनगर, गोंदिया

घटनास्थळ – मौजा फुलचुर RTOकार्यालय गोंदिया 02कि.मी.पश्चीम

घटना ता. वेळ – दि.18/11/2025 चे वेळ 16/22 वा. ते दि. 04/12/2025 चे वेळ 15/55वा .दरम्यान

प्रकरण अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व पो. स्टॉफ सह सापळा रचुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं.2यांनी तक्रारदाराकडे काम असलेल्या वाहनाचे हस्तांतरण करून देण्याकरीता शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. स्वतः करीता व आरोपी क्रं.01करीता लाच रक्कमेची मागणी करून तक्रारदार यांचे प्रलंबित काम झाल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. आरोपी क्रं.01 यांनी आरोपी क्रं.02यांना लाच मागणी करीता प्रोत्साहन दिले व शासकिय टॅक्सच्या व्यतिरीक्त 70,000/-रू. लाच रक्कम तक्रारदार यांचे कडून पंचासमक्ष आरोपी क्रं.2 यांनी स्विकारल्याने,त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध

अधिनियम 1988 सुधारणा 2018कलम 7अ,12 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता फिर्यादी यांचे लेखी तक्रारी वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला

दाखल-मपोहवा सुनिता पंधरे/1476

तपास-पो.नी.उमाकांत उगले ला. प्र. वी. गोंदिया

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Revchand Khushal Singanjude (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Revchand Khushal Singanjude

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**14.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**No. (क्र.):** 15101000402RKSM8101S

**Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल् या/पाहिलेल् या) शारीरिक वैशिष् टये, व् यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच् या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1972 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1968 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व् यंग वैशिष् टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच् या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल् याच् या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त् यापेक्षा अधिक तपशील दिल् यास फक् त यातील रकान् यांची नोंद घेतली जाईल)**